# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन  डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक २५ | बुधवार, दि.२९ मे २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# भंडारा-गोंदिया लोकसभेच्या जागेवरुन सट्टा बाजारातही संभ्रम

## कुठे मेंढे तर कुठे पडोळेंकडे कल: पैजा घेताना सावध पाऊल

**गोंदिया:** भडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी पार पडली. त्यानंतर आता ४ जूनला मतमोजणी होणार आहे. पण त्यापुर्वी मतदारसंघात भाजप आणि काँग्रेसच्या उमेदवारांच्या विजयाचे अंदाज बांधले जात आ-हेत. दोन्ही उमेदवारांना विजयाचा पूर्णपणे आत्मविश्वास असला तरी सट्टाबााराचा कुणाही एकाकडे कस नसून संभ्रमाची स्थिती असल्याचे चित्र आहे.त्यातच या मतदारसंघात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांचेही राजकीय भविष्य जनता ठरवणार आहे. त्यामुळे सर्वांच्या नजरा आता ४ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे लागल्याचे चित्र आहे.




या लोकसभा मतदारसंघातून १८ उमेदवारांनी नशीब आजमावले आहे. ईव्हीएममध्ये उमेदवारांचे भाग्य सील झाले असून नवा खासदार कोण हे ४ जून रोजी स्पष्ट होणार आहे. या मतदारसंघात थेट लढत ही भाजप आणि काँग्रेसच्या उमेदवारामध्ये झाली.

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा क्षेत्रांपैकी साकोली क्षेत्रातून सर्वाधिक ७१.३२ टक्के मतदान झाले. त्या खालो-खाल अर्जुनी मोरगाव क्षेत्रात ७०.८७ टक्के मतदान झाले आहे. सहाही विधानसभा मतदारसंघापैकी येथे टक्केवारी अधिक असल्याने येथील मतदारांचा कौल कोणाला तारणार, असा प्रश्न आता विच-ारला जात आहे.

येथील सहा क्षेत्रांपैकी तिरोडामध्ये सर्वात कमी म्हणजे ६२.८३ टक्के मतदान झाले आहे. त्यापेक्षा थोडे अधिक मतदान गोंदिया क्षेत्रात ६३.७४ टक्के झाले आहे. या दोन्ही ठिकाणी महायुतीच्या उमेदवाराला लिड घेण्याची खात्री आहे. मात्र, मतदानाची टक्केवारी घटल्याने स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांनाही चिंता आहे. तर, दुसरीकडे महाआघाडीच्या नेत्यांना ही घटलेली टक्केवारी सोईची वाटत आहे.

या दोन्ही प्रमुख उमेदवारांचे समर्थक, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा विजय पक्का असल्याचे दावे-प्रतिदावे करीत आहेत. तर भाजप उमेदवाराच्या समर्थकांना विजयाचा विश्वास तर काँग्रेस उमेदवाराच्या समर्थकांना विजयाची खात्री आहे. पण असले असले तरी सट्टा बाज-ारातील बुकीच्या आकलनानुसार सहा मतदारसंघात कुठे भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांना ३० पैसे तर कुठे काँग्रेसचे उगमेदवार प्रशांत पडोळे यांना ३० पैसे भाव दिला जात आहे.

सट्टाबाजाराचा कल कुणा एकाकडे स्पष्ट नसल्याने या मतदारसंघाच्या जागेवरुन संभ्रमाचे वातावरण आहे. तर जिल्ह्यातील राजकीय जाणकारसुद्धा यावेळेस ठामपणे कुणाला स्पष्ट कल मिळेल हे सांगण्याबाबत संभ्रमात दिसून येत आहे.

### १२ लाख २४ हजार ९५६ मतदारांनी बजा-वला मतदानाचा हक्क

**भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात १८ लाख २७ हजार १८८ मतदारांपैकी प्रत्यक्षात १२ लाख २४ हजार ९५६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला आहे. या मतदारसंघात एकूण ६७.०४ टक्के मतदान झाले.**

### पैजे घेणाऱ्यांचा कल मेंढे यांच्याकडे

**या मतदारसंघातील निवडणूक निकालावरुन यंदा प्रथमच शेवटच्या क्षणापर्यंत संभ्रमाचे वातावरण आहे. निवडणुकीतील भाजप आणि काँग्रेसच्या उमेदवाराच्या विजयावरुन जिल्ह्यात पैजासुद्धा घेतल्या जात आहेत. पैजा घेणाऱ्यांचा कल भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांच्याकडे अधिक दिसून येत आहे.**

### आधीचे भाव बदलले

**मतदान झाल्यानंतर काँग्रेसचे उमेदवार प्रशांत पडोळे यांना सट्टा बाजारात ८५ पैसे तर भाजपचे उमेदवार सुनील मेंढे यांना ३५ पैसे भाव होता. मात्र निवडणुकीचा निकाल येण्यास ७ दिवसांचा कालावधी शिल्लक असताना यात बदल झाल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे या मतदारसंघातील सहाही मतदारसंघाबाबत सट्टाबाजाराचे आकलन वेग-वेगळे आहे. कुठे सुनील मेंढे यांना ३० पैसे तर कुठे प्रशांत पडोळे यांना ३० पैसे भाव दिला जात आहे.**

### ६७.०४ टक्के एकूण मतदान

**भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात एकूण ६७.०४ टक्के मतदान झाले आहे. त्यामध्ये तुमसर विधानसभा क्षेत्रात ६७.५३, भंडारा विधानसभा क्षेत्रात ६६.०६, साकोली विधानसभा क्षेत्रात ७१.३२, अर्जुनी-मोरगाव विधानसभा क्षेत्रात ७१.३२, तिरोडा विधानसभा क्षेत्रात ६२.८३ तर गोंदिया विधानसभा क्षेत्रात ६३.७४ टक्के मतदान झाले आहे.**

### भाजपच्या बालेकिल्ल्यात मतदान घटले

**तिरोडा आणि गोंदिया विधानसभा मतदारसंघ हे भाजपचे बालेकिल्ले समजले जातात. मात्र या दोन्ही विधानसभा मतदारसंघात ६४ टक्केच्या आत मतदान झाले आहे. या मतदारसंघात मतदान घटण्याचे नेमके कारण काय याचा शोध घेतला जात आहे. पण यामुळे विजयाचे समीकरणावर काहीसा परिणाम होऊ शकतो.**

### पुन्हा येणार नवे आकडे

**सध्या सट्टा बाजारातील आकड्यावरुन संभ्रम दिसत आहे. त्यामुळे नेमका कुणावर पैसा लावावा याचा अंदाज अनेकांना घेता आलेला नाही. तथापि सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार २९ मे नंतर नव्याने आकडे खुलणार आहे. सध्या बुकींकडून अंतिम चाचपणी केली जात आहे. त्यानंतरच हे आकडे खुले होतील, असे सांगितले जात आहे.**

### कोण ठरणार वरचढ

**सुनील मेंढे:** भाजपचे उमेदवार खा.सुनील मेंढे हे दुसऱ्यांदा निवडणूक रिंगणात आहेत. या निवडणुकीत भाजप उमेदवार बदलणार अशी चर्चा होती. तर शेवटच्या क्षणापर्यंत यावरुन सस्पेन्स कायम होता. मात्र सुनील मेंढे यांना उमेदवारी मिळण्याचा सुरुव-ातीपासून ठाम विश्वास होता. त्यामुळे ते तेवढ्याच आत्मविश्वासाने तयारी करीत होते. त्यांच्या विजयासाठी महायुतीने पूर्ण ताकद लावली. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गटाचे) खा. प्रफुल्ल पटेल यांनीसुद्धा त्यांच्यासाठी भरपूर मेहनत घेतली. त्यामुळे विजयात कोण वरचढ होणार हे ४ जूनला स्पष्ट होईल.



**डॉ.प्रशांत पडोळे:** काँग्रेसकडून या मतदारसंघातून उमेदवारीसाठी अनेक नावे समोर आली होती. पण प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी डॉ. प्रशांत पडोळे यांच्या ना-वावर शिक्कामोर्तब करीत उमेदवारी दिली. तर निवडणुकीत त्यांच्या प्रचारापासून ते सभांचे नियोजन त्यांनीच केले. त्यांनी यासाठी मतदारसंघात तळ ठोकला होता. महाविकास आघाडीची मूठ बांधली. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात त्याचा फायदासुद्धा झाल्याचे बोलले जाते. पण निकाल काय लागतो याकडे लक्ष आहे. पण विजयाला घेवून सध्या काँग्रेस कार्यकर्त्यांत उत्साह दिसून येत आहे.



### ग्राहकांची धडधड वाढतेय

**उमेदवारांवर लावल्या जाणाऱ्या सट्ट्यासोबतच कोणते सरकार येईल, यावरही या जुगाऱ्यांच्या चर्चा रंगत आहेत. या बाजारात होणाऱ्या चढ-उतारामुळे शौकिनांच्या हृदयाची धडधडही कमी अधिक होत आहे. मतमोजणीचा दिवस जसजसा जवळ येत आहे. तसतशी सट्टा बाजारात पैसा गुंतविलेल्यांची झोप उडायला लागली आहे.**

### कोट्यावधीची उलाढाल

**शौकिनांमध्ये असलेली उत्सुकता आणि लावला गेलेला पैसा लक्षात घेता सट्टा बाजाराम मोघी उलाढाला होईल, असा अंदाज आहे. गोंदिया, भंडारा आणि साकोलीत मोठी आर्थिक उलाढाल झाल्याचे संकेत आ-हेत. उमेदवारांमवरील भाव कमी अधिक होत असल्याने हा बाजारही आता अस्थिर दिसत आहे. निकालानंतरच सारेकाही स्पष्ट होणार आहे.**




### येत्या १ जूनपासून नियम बदलणार

# लायसन्ससाठी आरटीओ मध्ये जाण्याची गरज नाही



**गोंदिया:-** वाहन चालवताना सर्वात महत्वाची गोष्ट असते ती म्हणजे ड्रायव्हिंग लायसन्स. हे कागदपत्र जवळ असणे गरजेचे असते. ते जर नसेल तर मोठा दंड होऊ शकतो. अनेकांना लायसन्स काढःने ही गोष्ट अत्यंत किचकट वाटते त्यामुळे ते अनेक लोक ते काढताही नाहीत. परंतु आता तुमच्यासाठी एक खुशखबर आहे.

ड्रायव्हिंग लायसन्सचा नवा नियम १ जूनपासून लागू होत आहे. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने नियमांमध्ये बदल केले आहेत. नवीन नियमानुसार, जर तुम्हाला आता ड्रायव्हिंग लायसन्स काढायचे असेल तर आरटीओला जाण्याची आवश्यकता भासणार नाही.

नवीन ड्रायव्हिंग लायसन्स मिळविण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (आरटीओ) चाचणी घेण्याचे सध्याचे बंधन रद्द केले जाईल. ड्रायव्हिंग लायसन्स आवडीच्या जवळच्या केंद्रावर ड्रायव्हिंग मिळवणाऱ्या व्यक्तीला त्याच्या टेस्ट देण्याचा पर्याय असेल.

वैध परवान्याशिवाय जर वाहन चालवले तर मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. हे १,००० वरून २,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात येणार आहे. जर अल्पवयीन व्यक्ती वाहन चालवत असताना पकडला गेला तर आता थेट पालकांवर कारवाई केली जाणार आहे. तसेच त्यांना २५,००० रुपयांचा मोठा दंड देखील केला जाणार आहे. तसेच वाहनाचे नोंदणी प्रम ाणपत्रही रद्द करण्याबाबत देखील कारवाई करण्यात येईल.

### किती शुल्क लागणार ?

**लर्निंग लायसन्स : १५० रुपये**
**लर्निंग लायसन्स चाचणी शुल्क : ५० रुपये**
**ड्रायव्हिंग टेस्ट शुल्क : ३०० रुपये**
**ड्रायव्हिंग लायसन्स : २०० रुपये**
**लायसन्स नूतनीकरण : २०० रुपये**
**दुसऱ्या वाहनाचे अतिरिक्त लायसन्स : ५०० रुपये**

### जुने वाहने बाद

**प्रदूषण करणारे तब्बल नऊ लाख जुने सरकारी वाहने सेवेतून बाद करण्यात येणार असल्याची माहितीही मिळाली आहे.**

### कठोर दंड

**वाहनचालक अल्पवयीन आढळल्यास २५ हजारांचा दंड केला जाईल. तसेच त्यास २५ व्या वर्षापर्यंत लायसन्स दिले जाणार नाही. मालकांची नोंदणी रद्द केली जाईल.**

### सुलभ अर्ज प्रक्रिया

**लायसन्सची प्रक्रिया सुलभ होण-ार आहे. वाहनाच्या प्रकारानुसार मोजकेच कागदपत्रे लागणार आहेत.**

# जहाल नक्षलवाद्याचे आत्मसमर्पण

# सहा लाखांचे होते बक्षीस




**गडचिरोली :** छत्तीसगड राज्यातील विविध चकमकींमध्ये सहभागी राहिलेल्या एका जहाल नक्षल्याने आज गडचिरोली येथे केंद्रीय राखीव दलाच्या पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. गणेश गट्टा पुनेम (वय ३५) असे आत्मसमर्पित नक्षल्याचे नाव असून, तो छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील बेचापाल येथील रहिवासी आहे.

गणेश पुनेम हा २०१७ मध्ये छत्तीसगड राज्यातील भैरमगड भागातील नक्षल्यांच्या पुरवठा समितीत सहभागी झाला. २०१८ पर्यंत तो या समितीचा उपकमांडर होता. २०१७ मध्ये छत्तीसगडच्या मिरतूर आणि २०२२ मध्ये तिम्मेनार येथे झालेल्या चकमकींमध्ये त्याचा सहभाग होता. महाराष्ट्र शासनाने त्याच्यावर ६ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. आज गणेश पुनेम याने केंद्रीय राखीव दलाचे पोलिस उपमहानिरीक्षक जगदीश मीणा यांच्यापुढे आत्मसमर्पण केले. त्यानंतर त्याला गडचिरोली जिल्हा पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले. या प्रसंगी केंद्रीय राखीव दलाचे उप कमांडट नितीन कुमार उपस्थित होते. २०२२ पासून आतापर्यंत २२ नक्षल्यांनी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले आहे.

नक्षलवादविरोधी अभियानामुळे, तसेच शासनाने नक्षलवाद्यांना आत्मसमर्पणाची संधी उपलब्ध करून दिल्याने २०२२ ते २०२४ या कालावधीत आतापर्यंत एकूण २२ जहाल नक्षलवाद्यांनी आत्म समर्पण केले आहे. विकासकामांना आडकाठी निर्माण करणा?या नक्षल्यांवर कारवाई करण्यास पोलीस दल तत्पर आहे. त्यांना सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करत आहे. त्यांनी हिंसेचा त्याग करून शांततेचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी केले आहे.

# नागझिरा व्याघ्र प्रकल्पात १२ वाघ,१८ बिबटयांची नोंद

**गोंदिया :** बौध्द पौर्णिमेची प्रकाशमय रात्र निसर्गप्रेमींसाठी पर्वणीची ठरली. दरवर्षी प्रमाणे बौध्द पौर्णिमेच्या दिवशी २३ मे रोजी नागझिरा व्याघ्र प्रकल्प परिसरात प्राणी गणना करण्यात आली. दरम्यान गणना करण्यासाठी मचानावर सज्ज असलेल्या वन्यप्रेमी आणि यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना सर्वश्रेणीच्या वन्यप्राण्यांचे दर्शन झाले. नागझिरा व्याघ्र प्रकल्पात १२ वाघासह एकूण १९८५ प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे नागझिरा व्याघ्र प्रकल्प वन्यप्रेमींसाठी आगामी काळात आकर्षणाचा केंद्र राहणार, असाही विश्वास व्यक्त केला जात आहे.



बौध्द पौर्णिमेला चंद्राच्या उजेडात प्राणी गणना केली जाते. दरम्यान पिटेझरी, नागझिरा, उमरझरी, डोंगरगाव, बोंडे, नवे-गाव राष्ट्रीय उद्यान, कोका या क्षेत्रात गणना पथक कार्यरत करण्यात आले. या गणना प्रक्रियेत वाघ, बिबट, रानकुत्रा, हरीण, अस्वल, रानडुक्कर, मुंगूस, रानगवे, निलगाय, सांबर, चितळ, वानर, मोर, साळींदर, रानमांजर, उदमांजर, भेटकी, तडस, हळद्या, कोकीळा, सनबर्ड, घार, चौसिंगा, पॅगोलियन, ससा, लाल तोंड्या माकड, गरूड, रानमांजर, रान कोंबडा आदि प्राणी पहावयास मिळाले. एंकदरीत नागझिरा व्याघ्र प्रकल्प बफर झोन परिसरात सर्व वर्गीय १९८५ प्राण्यांची नोंद करण्यात आली. यामुळे नागझिरा व्याघ्रप्रकल्प परिसर वाघांसह इतर वन्यप्राण्यांच्या अधिवासाने समृध्द असल्याचेही समोर आल्याने वन्यप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण पहावयास मिळाले.

### अशी आहे प्राण्यांची संख्या

**वाघ-१२, बिबट-१८, रानकुत्रे -८२, अस्वल -७५, रानडुक्कर-१२८, मुंगूस-६४, रानगवे-७२०, निलगाय,-७१, सांबर-५०, चितळ-११५, हरीण-१६, वानर-३८६, मोर-११६, साळींदर-७, रानमांजर-१, उदमांजर-१०, भेटकी-१६, हळद्या-१, कोकीळा-५, सनबर्ड-१, घार-१, चौसिंगा-३, लाल तोंड्या माकड-८१, गरूड-३, रानमांजर-१, रान कोंबडा-२ याप्रमाणे प्राण्यांची नोंद झाली आहे.**

### सर्वाधिक प्राणी नागझिरा परिसरात

**नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा बफ्फर झोन परिसर मोठ्या प्रमाणात व्याप्त आहे. या परिसरात पिटेझरी, नागझिरा, उमरझरी, डोंगरगाव, बोंडे, राष्ट्रीय उद्यान नवेगावबांध व कोका या क्षेत्राचा बफ्फर झोनमध्ये समावेश आहे. नागझिरा बफ्फर झोन परिसरात गणनेसाठी असलेल्या यंत्रणेची चांगलीच पर्वणी झाली. या क्षेत्रात एकूण १९८५ वन्यप्राण्यांच्या नोंदीपैकी तब्बल ६७६ प्राणी याच क्षेत्रात नोंदविण्यात आले. विशेष म्हणजे, या क्षेत्रात १० वाघ व ९ बिबट्यांचा अधिवास असल्याचे समोर आले.**

# निवृत्त पोलीस अधिकारी करणार जात पडताळणी

## जात पडताळणी समितीकरीता आदिवासी संशोधन व प्रशिक्षण विभागाचा निर्णय

**गोंदिया:-** राज्यातील अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीमध्ये कार्यालयीन कामकाज सुरळति होणेकरिता राज्य पोलीस दलातील सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक व पोलीस निरीक्षक अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने ठरवून दिलेल्या कामाकरिता घेण्यासाठी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य,पुणे व लेखाधिकारी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे,यांच्या स्तरावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या जातपडताळणी समितीमधील रिक्त पदावर आत्ता कंत्राटी पोलीसअधिकारी नियुक्तीचा मार्ग मोकळे करुन राज्यातील महायुती सरकारने नवीन पदभरतीची अपेक्षाच करु नका असेच स्पष्ट केले आहे.

सदर भरती संदर्सात सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे/ठाणे/पालघर/नाशिक/नाशिक-२/नंदुरबार/धुळे/ छत्रपती संभाजीनगर/किनवट/नागपुर/गोंदिया/अमरावती/यवतमाळ/गडचिरोली/चंद्रपूर यांना पत्र क्र.आस्था-२०२४/प्र.क्र.२६/पोलीस पदे/का-१/१३३६ दिनांक.२१/०५/२०२४ नुसार कळविण्यात आले आहे.

सुधारित आकृती बंधानु-सार पोलीस दक्षता पथकातील पोलिस उपअधिक्षक व पोलिस निरीक्षक यांच्या रिक्त असलेल्या पदानुसार,या कार्यालयाने मानधन तत्वावर बाह्यस्त्रोताव्दारे पो-लीस दक्षता पथकातील पदे




भरण्यास मंजुरी दिलेल्या पदांची संख्या विचारात घेऊन, प्रलंबित प्रकरणांची संख्या आणि पोलीस दक्षता पथकातील पदांची असण-ारी निकड लक्षात घेऊनच संदर्भिय समान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. २७१५/प्र.क्र१००/१३, दिनांक-१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयातील दक्षता पथकाकरिता सुधारित आकृतीबंधानुसार रिक्त असलेल्या पोलीस दक्षता पथकातील पोलिस उपअधिक्षक व पोलिस निरीक्षक यांची विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन जाहिरात देऊन पात्र अधिका-यांचे अर्ज मागविण्यांत यावे. प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करुन करार पध्दतीने ११ महिन्यांच्या कालावधी करिता नियुक्ती करण्यांत यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या मासिक पारिश्रमिक व भत्यांची परिगणना करुन मासिक पारिश्रमिकाची रक्कमेस या कार्यालयाची मान्यता घेऊनच नियुक्त उमेदवारांचे मानधन अदायगी करण्यात यावी. सेवानिवृत्त पोलीस उपअधिक्षक व पोलीस निरीक्षक पदे अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने घेताना आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. या कार्यालयाने मानधन तत्वावर बाह्यस्त्रोताव्दारे पो-लीस दक्षता पथकातील पोलिस उपअधिक्षक व पोलिस निरीक्षक ही पदे भरण्यास दिलेली मान्यता ही सेवानिवृत्त पो-लीस उपअधिक्षक व पोलीस निरीक्षक पदे सेवा करार पध्दतीने घेताच संपुष्टात येईल.याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अह-वाल या कार्यालयास सादर करण्यात यावे, असे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या मान्यतेने हे आदेश जारी करण्यात येत आहेत असे पत्र चंचल पाटील, सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी २१ मे रोजी काढले आहे.

# तलावात गाळ साचल्याने मासेमारी व्यवसायावर संकट

**गोंदिया:** तलावाचा जिल्हा म्हणून गोंदियाची ओळख असू-नही तलावांची स्थिती गंभीर आहे. अनेक वर्षांपासून गाळ उपाण्यात आला नाही. त्यातच अतिक्रमण वाढले आहे. त्यामुळे तलावे अखे-रची घटका मोजत आहेत.

त्यातच जिल्ह्यातील १४२१ मामा तलावांची मोजणी व सीमांकनाचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. त्यासाठी दहा कोटींच्या निधीची मागणी करणारा प्रस्ताव देखील शासनाकडे गेला. परंतु तो प्रस्ताव पूर्णत्वास आला नसल्याने जिल्ह्यातील मत्स्यक्रांतीची घोषणा पोकळ आश्वासन असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात तलावांची संख्या मोठी आहे. माजी मालगुजारी तलाव अद्यापही अस्तित्व टिकवून आहेत. मात्र वर्षानुवर्ष त्यांची दुरुस्ती व गाळ उपसण्यात आलेली नाही.

परिणामी या तलावांचे अस्तित्व धोक्यात येत आहे.



या तलावांवर जिल्ह्यातील भोई समाज मत्स्यव्यवसाय करतो. वंश पंरपरागत मासेमारी करणारा भोई ढिवर समाज आजही उपेक्षित जीवन जगत आहे. मात्र तलावांच्या अस्तित्व धोक्यात आल्याने त्यांच्या व्यावसायावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या समाजाकडे पर्यायी व्यवसाय नसल्याने त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्-नही उभा आहे. शासनाने जिल्ह्यात सिंचनाच्या सुविधेकडे लक्ष दिले. त्यावर कोट्यवधींचा निधी खर्च केला. मात्र मत्स्य व्यवसायासाठी आवश्यक उपाययोजना झाल्या नाहीत. परिणामी निम्म्याहून अधिक तलावांचे पाणी कमी झाले असून त्यामुळे मासेमारी व्यवसाय अडचणीत आला आहे.

या सर्व बार्बीचा विचार करता जिल्ह्यातील १४२१ मामा तलावांचे अस्तित्व कायम ठेवण्याच्या उद्देशासाठी तत्कालीन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी याकडे लक्ष घातले. गतवर्षी मामा तलावांचे सीमांकन व मोजणी करण्यासाठी १० कोटीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्याचे निर्देश मत्स्यसंवर्धन विभागाला दिले. या सर्वातून भोई समाजाला मत्स्यपालन करता यावे, असा प्रामाणिक उद्देश होता. मात्र ना प्रस्ताव तयार झाला, ना निधी मिळाला, अशी स्थिती आहे. त्यामुळे पुन्हा मामा तलावांच्या अस्तित्वाचा प्रश्न अधांतरीतच राहीला आहे.

## संपादकीय

### निवडणूक आयोग संशयाच्या घेऱ्यात?

भारतीय निवडणूक आयोग ही एक स्वतंत्र आणि स्वायत्त संस्था आहे.देशभरातील समस्त निवडणुकांचे आयोजन,नियोजन, व्यवस्थापन आणि संचालन करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगावर असते. हे काम अतिशय महत्त्वपूर्ण असल्यामुळे ते गांभीर्याने केले जावे अशी निवडणूक आयोगाकडून घटनाकारांची अपेक्षा होती.त्यामुळेच त्यांना स्वायत्त दर्जा बहाल करून प्रचंड अधिकार देण्यात आले होते. निवडणूक आयोगाने कोणाच्याही दबावात येऊन काम करू नये, तसेच कोणत्याही सत्तधारी पक्षाच्या हाताखालचे बाहुले बनू नये अशी निवडणूक आयोगाकडून जनतेची अपेक्षा असते.आतापर्यंत निवडणूक आयोगाने हे काम चोख बजावल्यामुळे त्यांच्यावर शंका किंवा संशय घेतला जात नव्हता.माजी निवडणूक आयुक्त टी.एन.शेषन त्यांच्या कार्यशैलीमुळे निवडणूक आयोगाचे महत्त्व लोकांच्या लक्षात आले होते.परंतु मागील काही वर्षापासून निवडणूक आयोग संशयाच्या घेऱ्यात सापडला असून हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टमध्ये निवडणूक आयोगाच्या संदर्भात अनेकांनी केसेस दाखल केलेल्या आहेत.त्यामुळे निवडणूक आयोगासारखी स्वतंत्र आणि निष्पक्ष संस्था वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.यावर्षी तर निवडणूक आयोगावर चारही बाजूने टीकेचा मारा होत असून आयोगाचे महत्त्व त्यामुळे दिवसेंदिवस कमी होत चालले आहे.भारतीय लोकशाहीतील ज्या अनेक स्वायत्त संस्था आहे त्यांच्यासाठी ही गंभीर बाब असून भारतीय लोकशाहीला कमजोर करण्यासाठी जर आपल्या स्वतंत्र संस्थांचा सत्ताधाऱ्यांकडून गैरवापर होत असेल तर येणारा काळ अत्यंत कठीण आहे.

पुनम अग्रवाल यांनी निवडणूक आयोगाला पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील मतदानाची आकडेवारी मागितली तेव्हा निवडणूक आयोगाने आमच्याकडे माहिती नसून तुम्ही त्या त्या राज्याला माहिती मागा असे सांगून हात झटकले.त्यानंतर अनिकेत आगा यांनी माहिती मागितली तर त्यांना उत्तर आले की,सध्या आमच्याकडे माहिती नाही.निवडणूक संपल्यानंतर तुम्हाला बाकी तपशील मिळेलच. लोकांनी निवडणूक आयोगाकडे ही माहिती मागण्याचे कारण फार गंभीर आहे.कारण पहिल्या चार टप्प्यात एक कोटी सात लाख इतकी जास्तीची मते नंतर जोडण्यात आली आहे.टाइम्स ऑफ इंडिया मध्ये या संदर्भात बातमी प्रकाशित झाली आहे.त्यामुळे ADR या संस्थेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.या सर्व गोष्टी निवडणूक आयोगाची विश्वासार्हता कमी करणाऱ्या असून लोकांचा संशय बळवणाऱ्या आहेत.सध्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाने खूप प्रगती केलेली आहे.अत्याधुनिक साधने उपलब्ध आहे.पूर्वी विज्ञान इतके प्रगत नसताना सुद्धा दुसऱ्याच दिवशी संपूर्ण आकडेवारी निवडणूक आयोग जाहीर करत होता.मग आता मात्र आठ, दहा,बारा दिवसानंतर निवडणूक आयोग आकडेवारी जाहीर करत असेल आणि तीही एक कोटी पेक्षा मते वाढवून तर निश्चितपणे संशय घेण्याला जागा आहे.तसेच फॉर्म १७ उ वरील डाटा आपल्या वेबसाईटवर टाकण्यास निवडणूक आयोग टाळाटाळ का करीत आहे?सर्वसामान्य जनतेच्या मनात तर शंका आणि भीती आहेच;परंतु माजी निवडणूक आयुक्त एस वाय.कुरेशी यांनी सुद्धा निवडणूक आयोगाच्या या गोंधळाबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे.तसेच संपूर्ण देशात याबाबतीत लोकांमध्ये प्रचंड चीड आणि संताप आहे.

निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यासाठी तीन सदस्य समितीमध्ये एक सत्ताधारी,एक विरोधी पक्ष आणि एक सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश अशी समिती पूर्वी नेमली होती.परंतु नंतर त्यातून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला वगळण्यात आले.आता सत्ताधारी पक्षाचे दोन आणि विरोधकांचा एक सदस्य असल्यामुळे बहुमत हे सत्ताधाऱ्यांच्या बाजूने राहील अशी चलाखी करण्यात आली.त्यामुळे सरकारला सत्तेचा गैरवापर करून निवडणूक आयोगाला पूर्णपणे आपल्या ताब्यात ठेवायचे आहे व निवडणुकीत गडबड करायची आहे अशी सर्वत्र चर्चा आहे.सरकार जर पारदर्शी असते सरकारने तटस्थपणे निवडणूक आयोगात सदस्यांची नेमणूक केली असती.परंतु आपल्या बाजूने बहुमत कसे राहील याची काळजी घेऊन सरकार निवडणूक आयोगाकडून आपल्याला पाहिजे तशी कामे करून घेत आहे.काही दिवसांपूर्वी एका निवडणूक आयुक्ताने दिलेला राजीनामा सुद्धा त्याच्यावर असलेला दबाव हेच मुख्य कारण आहे.असेच जर होत राहिले तर निवडणुकीला काही अर्थ राहणार नाही.

भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार विचारपूर्वक बजावल्यानंतरही जर आपली मते दुसऱ्या उमेदवाराला जात असतील तर निवडणुकीला आणि मतदानाला सुद्धा काही अर्थ नाही. मतदान कमी होण्याचे कदाचित हेच कारण असू शकते.कारण मतदान केल्यानंतरही आपले मत हे आपण दिलेल्या उमेदवाराला जात नाही असा आता लोकांचा पक्का समज झालेला आहे. त्यामुळे लोक मतदानासाठी घराच्या बाहेर पडायला तयार नाही. अशाप्रकारे रडीचा डाव खेळून जर निवडणुका जिंकल्या जात असतील तर निवडणुकीवर होणारा अब्जावधी रुपयांचा खर्च पाण्यात गेल्यासारखाच आहे.त्याचबरोबर सामान्य माणसाच्या मतालाही कवडीची किंमत राहिलेली नाही असे दिसून येते.आपल्या मतदारसंघातील मतदानाची खरी आकडेवारी जर निवडणूक आयोगाकडून आपल्याला माहीत होत नसेल तर ही सरळ फसवणूक आणि धोकेबाजी आहे.ज्या लोकांनी अतिशय कष्टाने या देशाची संविधानिकदृष्ट्या अतिशय सुंदर पायाभरणी केली तो पायाच खिळखिळा करून विशिष्ट वर्गाच्या हातात सत्ता केंद्रित करण्याचे हे कारस्थान आहे.त्यामुळे येणाऱ्या काळात जनता जर रस्त्यावर उतरली तर त्यासाठी सरकारच सर्वस्वी जबाबदार राहणार आहे.कारण एक दिवस जनतेच्या संयमाचा बांध फुटणार आहे आणि आपल्या हक्क आणि अधिकारासाठी ती रस्त्यावर उतरणार आहे.त्यामुळे सरकारने जनभावनेचा आदर करून नि:पक्षपणे निवडणुका घ्याव्यात आणि अतिशय सुंदर रचना असलेल्या निवडणूक आयोगाचे महत्त्व अबाधित ठेवावे.– **प्रेमकुमार बोके**

## जिल्हा परिषद सहा शाळांचा निकाल शंभर टक्के;४७० विद्यार्थी प्राविण्यसूचीत

**गोंदिया :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. यात गोंदिया जिल्हा परिषदेच्या एकूण २२ शाळेतील ४७० विद्यार्थी प्राविण्यसूचीत आले असून ५३६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरूगानंथम यांनी अभिनंदन केले आहे.

जिल्हा परिषदेच्या २२ माध्यमिक शाळा आहेत.या शाळांमधून इयत्ता दहावीमध्ये एकूण १३५८ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली.जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा बनाथर, काटी, सौंदड, नवेगावबांध, बोंडगावदेवी, गांगला शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.तर १६ शाळांचा निकाल ९० टक्क्यापेक्षा अधिक आहे.उल्लेखनीय म्हणजे, बनाथर येथील जिल्हा परिषद शाळेतील सर्वाधिक ४२ विद्यार्थ्यांनी प्राविण्यसूचीत स्थान प्राप्त केले. त्याखालोखाल गोरेगाव येथील शहीद जान्या तिम्या माध्यमिक शाळेतील ४० विद्यार्थ्यांनी, जि.प.माध्यमिक शाळा सडक अर्जुनी ३८,जि. प.शाळा सुकळी डाकराम ३७,भारतीय विद्यालय एकोडी आणि जि.प.माध्यमिक शाळा परसवाडा येथील प्रत्येकी ३६,जि.प.शाळा वडेगाव३१,जि.प.शाळा तिरोडा २७,जि.प.शाळा देवरी २७,जि.प.शाळा सौंदड २६,जि.प.शाळा नवेगावबांध १७,जि.प.शाळा काटी १४,जि.प.शाळा दवनिवाडा १२,जि.प. शाळा कट्टीपार ९,जि.प.शाळा आमगाव ६,जि.प. शाळा ककोडी २,जि.प. शाळा अर्जुनी मोरगाव ९,जि.प.शाळा बोंडगावदेवी ५,जि.प.शाळा कावराबांध १० तर जिल्हा परिषद शाळा साखरीटोला येथील ११ विद्यार्थी प्राविण्यसूचीत आले आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील २६६ विद्यार्थी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरूगानंथम ,जिल्हा परिषद अध्यक्ष पकंज रहागंडाले,उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती इंजी.यशवंत गणवीर, शिक्षणाधिकारी (प्राथ.)सुधीर महामुनी,शिक्षणाधिकारी (माध्य.) डॉ. महेंद्र गजभिये, यांनी सुध्दा जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता दहावीच्या निकालावर आनंद व्यक्त करून सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी अशाप्रकारे करा उपाययोजना

हिट वेव्ह अर्थात उष्णतेची लाट ही एक मुक आपत्ती (Silent Disaster) आहे. सर्वसाधारणपणे एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ डिग्री सेल्सीअसने जास्त असेल तर त्याला उष्णतेची लाट संबोधतात. उष्णतेच्या लाटेमुळे शारिरीक ताण पडून उष्माघात होण्याची शक्यता असते. उष्माघातापासून होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत उष्णतेची तीव्रता लक्षात घेता, या उष्णतेपासून बचाव कसा करावा हे जाणून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना कराव्यात.



**काय करावे :** तहान लागलेली नसली तरी सुध्दा पुरेसे पाणी प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सूती कपडे वापरावेत. बाहेर जातांना गॉगल्स, छत्री, टोपी, बुट अथवा चप्पलचा वापर करावा. प्रवास करतांना पाण्याची बाटली सोबत घ्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी अथवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा. शरिरातील पाण्याचे प्रमाण कमी असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, लिंबूपाणी, ताक इत्यादींचा नियमीत वापर करावा. अशक्तपणा, स्थुलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. शक्यतो उन्हात जाणे टाळावे, आवश्यक कामे असल्यास उन्हात जाण्यापूर्वी भरपूर पाणी प्यावे अथवा लिंबू शरबत प्यावे. उन्हात जाण्या अगोदर जेवण करावे, उपाशा पोटी उन्हात जाऊ नये. कान, डोके व डोळ्याचा उन्हापासून बचाव करणे आवश्यक असल्यामुळे डोक्याभोवती पांढरा रुमाल अथवा दुपट्टा गुंडाळावा. घर थंड ठेवण्यासाठी पडदे व सनशेडचा वापर करावा. ओलसर पडदे, कुलर, पंखा यांच्या मदतीने घर थंड ठेवावे. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांनी शक्यतो सकाळी लवकर अथवा सायंकाळी सावलीत जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा. थंड पाण्याने वेळोवेळी आंघोळ करावी. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच त्यांना पुरेसे पाणी पिण्यास द्यावे.

**काय करु नये :** ज्येष्ठ नागरिकांनी व बालकांनी उन्हात बाहेर जाऊ नये. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे अंगात घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी २ ते ४ या वेळेत स्वयंपाक करणे टाळावे, स्वयंपाक घर हवेशीर ठेवावे. मद्य, चहा, कॉफी, सॉफ्ट ड्रिंक्स टाळावे. खुप प्रथिनयुक्त अन्न आणि शिळे अन्न खाऊ नये.

सद्यस्थितीत उष्णतेची तीव्रता लक्षात घेता, उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी तसेच उष्माघातामुळे होणारे मृत्यू टाळण्याकरीता नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीकोनातून वरील बाबींचा प्रामुख्याने अवलंब करावा.

**कैलाश गजभिये, उपसंपादक,**
**माहिती कार्यालय,गोंदिया**

# तू बुद्ध शरणमे आजा अपने उद्धार के लिए!

## गोंदियात बुद्ध जयंती उत्साहात



**गोंदिया:–** तथागत भगवान बुद्धांच्या २५८७ व्या जयंती निमित्त आयोजित संगीतमय मैफलने वाहवाही लुटली. तू बुद्ध शरणमे आजा अपने उद्धारके लिए या सादर करण्यात आलेल्या गीतामुळे संपूर्ण वातावरण बुध्दमय झाले.राजस्थान येथील भरतपूरच्या बहुजन मिशनरी गायिका निशा बौद्ध यांनी हे गित सादर केले. त्यांनी भारतीय संविधानाच्या समर्थनार्थ सादर केलेले तेरे संविधान मे जो शक्ती हैं, मै शिष झुकाये जाती हुं! या गाण्यावर श्रोतेमंडळी भावविव्हळ झाली होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने येथील भीमनगरच्या मैत्रियबुद्ध बुद्ध बिहाराच्या मैदानावर हा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

तत्पूर्वी शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. जगमे बुद्ध का नाम हैं येही भारत की शान हैं! आदि घोषवाक्यानी गोंदिया नगरी दुमदुमून गेली. संपूर्ण वातावरण बुध्दमय झाले होते. येथील भीमनगरच्या मैदानावरून डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्व.जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गेंदलाल तिरपुडे यांनी पंचशील झेंडा दाखवून रॅली प्रस्थान करण्यात आली. या रॅली मध्य मोठ्यासंख्येने कार, बाईक आणि रथांचा समावेश होता. या रथांवर सजलेले धार्मिक देखावे, यामध्ये सम्राट अशोक, अंगुलीमाल यांचे बुद्धांना शरण जाणे , सुजाताने तथागताना खीर ग्रहण करण्यास देणे आदि विविध देखाव्यांचा समावेश होता. मिरवणुकीत सर्वांनी परिधान केलेले शुभ्र वस्त्र आणि पंचशील झेंडे यांचे आकर्षण ठरलं ! डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने या दोन दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान नागपूरचे भदंत डॉ धम्मज्योती महाथेरो आणि भदंत नागदीपांकर यांनी धाम्मोपदेश दिला. ते म्हणाले की, देशात विषमतामय वातावरण डोके वर काढत असून भारताला बुद्धांचे विचार आत्मसात करण्याची नितांत गरज आहे. युनियन पब्लिक सर्विस कमिसनच्या परीक्षेत गोंदियातील प्रविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती समितीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# एक्यूट पब्लिक शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**गोंदिया:महाराष्ट्र राज्य** उच्च माध्यमिक शालांत परिक्षेचा निकाल नुकताच जाहिर झाला. त्यात एक्यूट पब्लिक शाळेचा १००% निकाल लागल्याने एक्यूट पब्लिक शाळेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह शनिवारला पार पडला.

या परिक्षेत विज्ञान शाखेतिल एकूण ५२ विद्यार्थ्यापैकी १९ विद्यार्थी प्रवीण्यप्राप्त केले आहे. तर ३३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. तसेच वाणिज्य शाखेतुन एकण १७ विद्यार्थ्यापैकी १२ विद्यार्थी प्रवीण्यप्राप्त आहेत तर ०५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कु.अपूर्वा संजयकुमार भास्कर ही विद्यार्थिनीनें शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविले असून ८७.३३% गुण मिळविले आहेत. तसेच कु. मोनाली राहंगडाले ८५.१७% द्वितीय क्रमांक पटकाविले, कु. वैभवी जैतवार८४.३३% पटकाविले आणि तृतीय क्रमांक मिळाविले आहे. त्याच प्रमाणे वाणिज्य शाखेतुन प्रेयश तुरकर (८७.१७% प्रथम क्रमांक), मनीष भोयर (८६.५०% द्वितीय क्रमांक) आणि कर्तवी भरने (८५.१७%) तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहे.

या सत्कार समरोहाला संज्योत बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या प्रेरणास्त्रोत श्रीमती गीताताई भास्कर, सचिव संजयकुमार भास्कर, सह सचिव एस. शुभा, शळेच्या मुख्याध्यापिका सौ. नंदा सोनवाने,हेड मिस्ट्रेस उज्जवला, के. डी. भास्कर हाईस्कूल आणि जूनियर कॉलेज डांगोर्लीच्या मुख्याध्यापिका निविशा , रोजी किड्स कॉन्वेंटच्या मुख्याध्यापिका श्रीमती एकता आणि ढेकवार सर, कापगते सर, पांडे सर, सर्व शिक्षिका, पालकवर्ग, विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थिति होते. संजयकुमार भास्कर सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बहुमोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचा भविष्यासाठी शुभाशीर्वाद दिले.

## महाराष्ट्र राज्य प्रविण प्रशिक्षक संघटनेची जिल्हा कार्यकारीणी गठित

**गोंदिया**: येथील जेष्ठ नागरीक संघाच्या कार्यालयात २४ मे रोजी महाराष्ट्र राज्य प्रविण प्रशिक्षक संघटना शाखा गोंदियाची समन्वय सभा पार पडली.या सभेत जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यामध्ये अध्यक्ष नारायणप्रसाद जमईवार, कार्याध्यक्ष संजय कटरे,सरचिटणिस चंद्रकांत गौतम,उपाध्यक्ष–सौ.राखी ठाकरे, सहसचिव आशा कुंभरे, कोषाध्यक्ष विजय भुरे, सल्लागार महेंद्र मेश्राम, श्रीमती नाहीद कुरैशी, प्रसिद्धी प्रमुख अजय अंबादे, कार्यकारीणी सदस्यात सौ.मेघा राखडे, सौ.कामीणी गणविर, सौ.चेतना टेंभुर्णे, सौ.संध्या ढवळे, सौ.ममता राऊत, सौ.भुमिता येळे, सौ.प्रज्ञा बंसोड,



श्री.हेमकृष्ण संग्रामे यांची निवड करण्यात आली.

सभेत २०२३–२४ वर्षातील प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये प्रशिक्षण कार्यक्रमाची गुणवत्ता, आलेल्या अडचणी, मानधन मिळण्यासाठी होणारा उशीर,गुणवत्ता वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना बाबतीत चर्चा करण्यात आली. तसेच वार्षिक सदस्यता फ्री ५००/–रू ठरविण्यात आली. वैयक्तिक माहिती पत्रक भरून घेण्यात आले,तसेत ज्यानी भरले नाही त्यांनी त्वरित भरून देण्याचे आवाहन करण्यात आले. पुढे प्रविण प्रशिक्षकाच्या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी व प्रशिक्षण कार्यक्रम गुणवत्ता पुर्वक होण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्याचे ठरविण्यात आले.

### जाहिरात फलकामुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्याचे आदेश

**गोंदिया.२८ :** घाटकोपर, मुंबई येथे १३ मे २०२४ रोजी जाहिरात फलक कोसळल्याची घटना घडलेली आहे. या पार्श्वभूमीवर मान्सूनपूर्व कालावधीत व अन्य कालावधीत होणा?या दुर्घटनांमुळे जिवित हानी टाळण्यासाठी महत्वाच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्यामुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष प्रजित नायर यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन संबंधित अधिकारी/ विभागाने आपले कार्यअधिकार क्षेत्रानुसार पुढील प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमीत केले आहे.

# मध्य प्रदेशातून हरणाच्या मांसाची महाराष्ट्रात तस्करी

## गोंदिया तालुक्यात तीन ठिकाणी धाड: सहाजणांना चौकशीसाठी घेतले ताब्यात

**रावणवाडी:** मध्य प्रदेशातील बालाघाट मुडेशवरा परिसरात हरणाची शिकार करुन त्याच्या मांसाची महाराष्ट्रातील गोंदिया तालुक्यातील सिरपुर, कामठा, पांजरा, बिरसी येथे विक्री करण्यात आली. वन विभागाला मिळालेल्या गुप्त माहितीवरुन २४ मे रोजी गोंदिया वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या तिन्ही ठिकाणी छापा टाकून हरणाचे मांस व साहित्य जप्त केले. या प्रकरणी चौकशीसाठी सहाजणांना ताब्यात घेतले आहे.



प्राप्त माहितीनुसार, मध्य प्रदेशातील बगडमारा येथे एका हरणाची शिकार करण्यात आल्याचा प्रकार २४ मे रोजी उघडकीस आला. हरणाचे मांस विक्री करण्याचे काम मागील दोन वर्षांपासून गोंदिया तालुक्यातील सिरपुर येथील दोनजण करीत असल्याची बाब या कारवाईदरम्यान पुढे आली. शुक्रवार (दि.२४) सिरपुर येथे मध्य प्रदेशातून हरणाचे मांस आले असल्याची गुप्त माहिती वन विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली.

या माहितीच्या आधारावर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सिरपुर येथे छापा टाकून दोनजणांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांनी कामठा येथील एका ढाब्यावर छापा टाकून हरणाचे मांस व साहित्य जप्त केले. याप्रकरणी वन विभागाने सहाजणांना ताब्यात घेतले आहे. बिरसी बटालियन परिसरातील काहीजणांनी या हरणाच्या मांसाची खरेदी केल्याची चर्चा आहे. तर कामठा येथील एका ढाब्यावर हे मांस शिजविले जात असल्याची माहिती आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सिरपुर येथे छापा टाकून केलेल्या कारवाईमुळे अनेकांचे धाबे दणाणले आहे. यात आणखी काहीजण अडकण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या घटनेमुळे मात्र जिल्ह्यात एकच खळबळ माजल्याचे दिसून येत आहे.

### कारवाईची माहिती देण्यास टाळाटाळ

**हरणाच्या मांसाची विक्री केल्याप्रकरणी गोंदिया वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी गोंदिया तालुक्यातील कामठा, सिरपुर येथे छापा टाकून २४ मे रोजी दुपरी चार वाजता कारवाई केली; पण या कारवाईची माहिती देण्यास वन विभागाचे अधिकारी टाळाटाळ करीत होते.**

**या प्रकरणाच्या चौकशीच्या अनुषंगाने सहाजणांना चौकशीसाठी बोलाविले आहे. एका घरातून आणि ढाब्यावरुन हरणाचे मांस जप्त करण्यात आले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.**
**दिलीप कौशिक, वन परिक्षेत्र अधिकारी, वन विभाग गोंदिया**

# पशुधनाचे ईअर टॅगिंग १ जूनपासून बंधनकारक

कोरोनानंतर सार्वत्रिक साथीचे आजार समाजासाठी आव्हान ठरत आहे. मनुष्य प्राण्यांसोबत पशुंनाही साथीच्या आजाराची मोठी किंमत चुकवावी लागली आहे. त्यामुळे आरोग्य व्यवस्था उपलब्ध करताना नोंदणी अभावी कोणतेही पशुधन वंचित राहू नये यासाठी आधार कार्ड च्या धरतीवर पशुंसाठी ईअर टॅगिंग केले जात आहे. सुदृढ, निरोगी व उपयोगी पशुधनासाठी १ जून पासून प्रत्येक पशूचे ईअर टॅगिंग आवश्यक करण्यात आले आहे. जनावरांची खरेदी विक्री करताना देखील ही बाब आवश्यक करण्यात आली आहे. याची समस्त शेतकऱ्यांनी, पशुपालकांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

राज्यातील सर्व पशुधनाची सर्वकष माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी. संभाव्य साथीच्या रोगाचे अंदाज व त्यादृष्टीने करावयाच्या उपाययोजनांचे नियोजन करणे सोयीचे व्हावे यादृष्टीने, एखाद्या भागात उद्भवणारे आजार विचारात घेवून उपाययोजना करणे, पशु व पशुजन्य उत्पादनात वाढ करण्याच्यादृष्टीने राज्यातील सर्व पशुधनाचे ईअर टॅगिंग करुन त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. राज्यात येत्या १ जून २०२४ पासून तर ईअर टॅग शिवाय पशुधनाची खरेदी–विक्री बंद करण्यात येणार आहे. पशुंना शासनाकडून देण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय संस्था, दवाखान्यातून देय होणाऱ्या पशुवैद्यकीय सेवा देय होणार नाहीत याचाही यात समावेश करण्यात आला आहे. याबाबत पशुपालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाच्यावतीने सर्व पशुपालकांना नियमीतपणे करण्यात येत आहे.

पशुधनामधील सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी तसेच प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम–२००९ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व पशुधनास ईयर टॅगिंग करणे व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक केले आहे. बाजारात



विक्रीसाठी येणाऱ्या सर्व पशुधनास ईअर टॅगिंग करणे गरजेचे आहे. दिनांक १ जून २०२४ पासून तर ईअर टँग नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडी बाजार व गावा–गावातील खरेदी–विक्री करण्यास प्रतिबंध केला जाणार आहे. त्यामुळे ईअर टॅग नसलेले पशुधन बाजार समितीमध्ये आणले जाणार नाहीत व त्यांची खरेदी–विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समिती घेणार आहे.

१ जून २०२४ नंतर ईअर टॅगिंग शिवाय पशुधनास पशुवैद्यकीय संस्था, दवाखान्यांमधून पशुवैद्यकीय सेवा देय होणार नाहीत. जाणीवपूर्वक नष्ट केलेल्या पशुधनाची ईअर टॅगिंग व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर असल्याशिवाय त्यांना केंद्र व राज्य शासनाकडून देय असलेले आर्थिक सहाय्य देय होणार नाही. नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का तसेच वन्य पशुंच्या हल्लूयामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास ईअर टॅगिंग केलेली नसल्यास नुकसान भरपाई रक्कम देय होणार नाही. राज्यातर्गंत विक्रीसाठी वाहतूक करण्यात येणाऱ्या राज्यातील पशुधनास ईअर टॅगिंग केल्याचे व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेतल्याची खात्री करूनच संबंधित पशुधन विकास अधिकारी यांनी आरोग्य प्रमाणपत्र, तसेच सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांनी वाहतुक प्रमाणपत्र द्यावे. पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंग असल्याशिवाय ती करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर कार्यवाही होवू शकते. राज्यात विक्रीसाठी येणाऱ्या राज्याबाहेरील प्रत्येक पशुनास ईअर टॅगिंग केले नसल्यास तपासणी नाक्यावरील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी–कर्मचारी यांनी या पशुधनास ईअर टॅगिंग करून घ्यावी. तसेच त्यांची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेण्यात यावी. १ एप्रिल २०२४ पासून बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्रात पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंगशिवाय बंद आहे. तसेच १ जून २०२४ पासून ईअर टॅग नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडी बाजार व गावा–गावातील खरेदी–विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. त्यामुळे ईअर टॅग नसलेले पशुधन बाजारसमित्यामध्ये आणले जाणार नाहीत व त्यांची खरेदी विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समितीने घ्यावी. पशुधनाच्या मालकी हस्तांतरणाबाबतच्या नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्वरीत अद्ययावत करून घेण्याची जबाबदारी संबंधित पशुपालकांची राहील. ग्रामपंचायतीमध्ये पशुंच्या विक्री किंवा परिवर्तनाचा दाखला देताना पशुधनाची ईअर टॅगिंग झाल्याशिवाय तो देण्यात येवू नये. दाखल्यावर ईअर टॅगिंग क्रमांक नमूद करण्यात येणार आहे.

**अलका पाटील,**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

# नागपूर विभागात गोंदिया अव्वल




## दहावीचा निकाल जाहीर; जिल्ह्याचा निकाल ९६.११ टक्के

**गोंदिया** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्चमध्ये घेतलेल्या इयत्ता दहावीचा निकाल सोमवारी दुपारी एक वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर केला. या निकालात नागपूर विभागात गोंदिया जिल्हा अव्वल असून, निकालाची एकूण टक्केवारी ९६.११ इतकी आहे. उल्लेखनीय म्हणजे, बारावी पाठोपाठ दहावीतही मुलीच समोर आहेत. त्यांच्या निकालाची टक्केवारी ९७.८८ इतकी आहे, मुलांच्या निकालाची टक्केवारी ९४.५० इतकी आहे. गोंदिया जिल्ह्यातून विवेक मंदिर इंग्लिश स्कूल ची विद्यार्थीनी कु. रिया रोशन गेडाम हिने ९८.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.तर चंचलबेन एम. पटेल इंग्लिश स्कूल ची विद्या-र्थीनी कु. उर्वशी सुनील दीघोरे हिने ९८.४० व अर्जुनी मोर येथील आचल पुस्तोडे हिने ९८.४० टक्के गुण मिळवित सयुंक्त दूसरा क्रमांक पटकावला.तर चंचलबेन स्कूलची कु. मौसमी मुनेश्वर जैतवार हिने ९८.२० टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकावला.

इयत्ता बारावीच्या निकालानंतर दहावीच्या निकालाची उत्कंठा आणि प्रतीक्षा विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांनाही होती. अखेर शिक्षण मंडळाने सोमवारी निकाल जाहीर करत त्यांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम दिला. गतवर्षीची परंपरा कायम राखत मुली यंदाही टक्केवारीत समोर आहेत. जिल्ह्याचा निकाल ९६.११ टक्के इतका लागला. मुलांच्या निकालाची टक्केवारी ९४.५० इतकी असून, मुलींच्या निकालाची टक्केवारी ९७.८८ टक्के इतकी आहे.

जिल्ह्यातून प्रावीण्य श्रेणीत ६३७३ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ६९७६, द्वितीय श्रेणीत ३४७४, तर उत्तीर्ण श्रेणीत ६३२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात ९४९२ मुले, तर ८६६८ मुली अशा १८ हजार १६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यापैकी ८९७० मुले व ८४८५ मुली असे १७ हजार ४५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. जिल्ह्यात सर्वाधिक ९७.९४ टक्के निकाल सडक अर्जुनी तालुक्याचा आहे. सर्वात कमी ९४.६८ टक्के निकाल देवरी तालुक्याचा आहे.

**तालुकानिहाय निकाल...**

| | |
|---|---|
| गोंदिया : | ९६.६४ |
| आमगाव : | ९५.२५ |
| अर्जुनी मोरगाव : | ९६.३४ |
| देवरी : | ९४.६८ |
| गोरेगाव : | ९५.४३ |
| सडक अर्जुनी : | ९७.९४ |
| सालेकसा : | ९५.९४ |
| तिरोडा : | ९५.४७ |

### रियाला व्हायचे प्रशासकीय अधिकारी!



इयत्ता दहावीच्या परीक्षेत विवेकमंदीर शाळेची विद्यार्थिनी रिया रोशन गेडाम ९८.६० टक्के गुण घेऊन जिल्ह्यात प्रथम आली. आय. आय. टी. मधून अभियंता होवून पुढे केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन प्रशासकीय अधिकारी होण्याचा मानस रियाने व्यक्त केला आहे. सुरवातीपासून अभ्यासावर विशेष भर दिला. कोणता ताण न घेता सहा ते सात नियमित अभ्यास केल्याचे रियाने सांगितले. रियाचे वडील, मोठे वडील शिक्षक असून आजोबा सुद्धा सेवानिवृत्त शिक्षक आहेत. घरात एकूणच शैक्षणिक वातावरण आहे. यश संपादन करण्यासाठी विशेष म्हणजे मुख्याध्यापक अशोक कारता, मुख्याध्यापिका डॉ. भावना माहुरे, योगेश शुक्ला, संगीता निगुडकर, रिता वराडे, उषा भगत, जैन मॅडम, राव सर यांनी तथा शाळेतील शिक्षकांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यामुळे हे यश संपादन करता आले.

# चंचलबेन मणिभाई पटेल इंग्लिश हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश



**गोंदिया:** स्थानिक चंचलबेन मणिभाई पटेल इंग्लिश हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. विद्यालयाची उर्वशी वैशाली सुनील दिघोरे हिने ९८.४० टक्के गुण प्राप्त करुन प्रथम क्रमांक पटकावला.

मौसमी निरुपा मुनेश्वर जैतवार हिने ९८.२० टक्के मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला. तृप्ती इंदू दिलीप लिल्हारे हिने ९४.८० टक्के गुण प्राप्त करुन तृतीय क्रमांक प्राप्त केला. सलोनी कन्हयालाल पटले ९३.६० टक्के, यशकुमार मनोज कटरे ९३.६० टक्के, त्रिवेणी ज्ञानेश्वर बिसेन ९३.४० टक्के, हिमांशी जितेंद्र रहांगडाले ९२.६० टक्के, वेदिका टेकराम पंचे ९२.४० टक्के, कृश्टी हरिप्रसाद रहांगडाले ९२.४० टक्के, श्रृती हौसराज हरिणखेडे ९२.२० टक्के, समिक्षा सागर वासनिक ९१.८० टक्के, प्रांजल संजय मेश्राम ९१ टक्के, आनंद विजय उईके ९०.८० टक्के आणि खुशी रहांगडाले ९० टक्के गुण प्राप्त केले.

सर्व ७८ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त गुण, ३८ विद्यार्थ्यांनी ८० टक्केपेक्षा जास्त आणि १० विद्यार्थ्यांनी ७५ टक्केपेक्षा अधिक गुण प्राप्त केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष गजेंद्र फुंडे, अनिल सेलूकर, नितीन फुंडे, धनश्री आर.नागदेवे, सी.एम.पी.शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतूक केले आहे.

# विद्या निकेतनची अदिती भदोरिया तालुक्यात प्रथम



**आमगाव** : येथील विद्या निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी अदिती भदोरिया हिने दहावीच्या परीक्षेत ९४.६० टक्के गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. अदितीने आपल्या यशाचे श्रेय पालक आणि शिक्षकांना दिले आहे.

विद्या निकेतन वेल्फ़ `अर असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र माहेश्वरी, कोषाध्यक्ष नरेश माहेश्वरी आणि संघटन सचिव रघुवीरसिंग सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापक पी. बी. भक्तवर्ती व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### छत्रपती विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

**आमगाव:** तालुक्यातील छत्रपती विद्यालय सितेपारचा दहावी परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून २४ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत तर २३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून ५६ विद्यार्थी परी-क्षेला बसले होते. विद्यालयातून कु. अस्मिता योगराज रिनाईत हिने ९२.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक सुमितकुमार लिखिराम हरीणखेडे ९१.६० टक्के, तृतीय क्रमांक कु.नंदिनी मुकेश बागडे ८९.६० टक्के हिने पटकावला.तर प्राविण्य श्रेणीत कु.सानिया देवेंद्र मेश्राम ८८.४०, कु. नेहा अजय निनावे ८८.२०, आर्यन शिवप्रसाद राणे ८७.६०, कु.प्रिती दिनेश हरिनखेडे ८६.६०, अस्विन दुर्गाप्रसाद राणे ८६.४०, कु.जागृती ढालचंद हरिनखेडे ८६, आदिती मुन्नालाल मटाले ८६,कु. सलोनी संजय बिसेन ८५.८०,कु. अर्चना इंद्रराज मेश्राम ८५.६०,शैलेश गणेश महारवाडे ८५ टक्के गुण मिळवित यश प्राप्त केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्री संत गाडगे महाराज शिक्षणसंस्था सितेपार संस्था अध्यक्ष ममता व्ही.चौधरी, कार्यवाह विन-ोद चौधरी तसेच संस्था पदाधिकारी, मुख्यापक श्री पटले व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

### ॲक्युट पब्लीक माध्यमिक शाळेचा निकाल शंभर टक्के

**गोंदिया:-** ॲक्युट पब्लीक स्कूल कटंगीकला यांनी यावर्षी सुद्धा माध्यमिक शालांत परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतून एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यात निशांत नुतनलाल नागपुरे ९० टक्के गुण घेऊन प्रथम, द्वितीय गगन ओमप्रकाश लिल्हारे ८८.७० टक्के आणि तृतीय सृष्टी रमेशचंद्र वैश्य ८७.४० टक्के हिने पटकावला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संज्योत बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे सचिव संजयकुमार भास्कर, संस्थेच्या सहसचिव शुभा शहारे, मुख्याध्यापक शिक्षकवृंद व पालकांना दिले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व शिक्षक वृंद व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.







# पी.डी.राहांगडाले विद्यालयाचे सुयश




**गोरेगाव:-** पी.डी.राहांगडाले विद्यालय गोरेगाव येथील मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या वर्ग १० वीचा शाळेचा एकुण निकाल ९३.५० टक्के लागलेला आहे शाळेतंर्गत प्रथम अभय संजय कटरे ९२%, द्वितीय कु. प्राची व्यंकटराव रहांगडाले ९१.२०% , तृतीय अविराज भोजराज पटले ८८.२०% तसेच प्राविण्य श्रेणीत कु. राधिका रेखलाल रहांगडाले, कु. प्रिसी जयेंद्र ठाकुर, कु. दिया राजू धमगाये, कु.प्रांजल महेन्द्र पटले, कु. मासूम दुर्वराज वैद्य, कु. दिप्ती शिवनारायण बिसेन, प्रेम ओमप्रकाश ओंकार, कु.लक्ष्मी हेमराज रहांगडाले व कु. दिया शालिकराम येळणे यांनी यश संपादन केले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव एड. टी.बी.कटरे, अध्यक्ष डॉ. टी.पी.येळे, संचालक मा.यु.टी.बिसेन, प्राचार्य सी.डी.म ेरघडे, पर्यवेक्षक ए.एच.कटरे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद हायस्कूलचे विद्यार्थी दहावीच्या परीक्षेत चमकले



**देवरी:-** सर्वत्र खासगी शाळांचा बोलबाला असताना आणि वीस वर्षापूर्वीपासून अडगळीत टाकलेली स्थानिक जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी लागलेल्या दहावीच्या निकालात आपल्या यशाचा डंका पिटला. अपूरी संसाधने असताना शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीने अखेर घवघवीत यश संपादन केले. परिणामी, जिल्हा परिषद शाळेच्या व्यवस्थापनाचे आणि विद्यार्थ्यांचे आज सर्वत्र कौतुक केल्या जात आहे. उल्लेखनीय म्हणजे या वर्षी घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत या विद्यालयाने केलेल्या नेत्रदीपक कामगिरीमुळे येथील सोयीसुविधा आणि शिक्षक संख्येच्या प्रश्नाने पुन्हा एकदा उचल खाल्ली आहे.

या विद्यालयातून डेलिया मंगलम ूर्ती सयाम या विद्यार्थिनीने ९३.२० टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविला. धनश्री योगराज बिसेन या विद्यार्थिनीने ९१.८० गुण घेत दुसरा, तेजस विजय मते या विद्यार्थ्याने ९१.४० टक्के गुण घेत तृतीय तर रत्नाकर हर्षवर्धन तागडे याने ९१ टक्के गुण संपादन करीत चौथा क्रमांक पटकाविला. उल्लेखनीय म्हणजे एकूण ४८ परीक्षार्थी पैकी ४७ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून शाळेची टक्केवारी ९८ एवढी राहिली. एकूण परीक्षार्थ्यांपैकी ४ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा अधिक, ८० टक्केच्या वर १८ विद्यार्थी, ७० टक्केच्या वर ९ विद्यार्थी, ६० चक्केच्या वर १० विद्यार्थी आणि ५० टक्केच्या वर ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी बंद पडलेल्या शाळेला चांगले दिवस दाखविण्यासाठी परिश्रम घेतले आणि अडगळीत पडलेल्या जिल्हा परिषदेच्या हायस्कूलला आज चांगले दिवस प्राप्त करून दिले. याचीच प्रचिती लागलेल्या दहावीच्या निकालातून दिसून येते. या निकालातून जिल्हा परिषद हायस्कूल पुन्हा एकदा प्रकाश झोतात आली असून सर्व काही शक्य आहे, हे दाखवून दिले आहे. परिणामी, या शाळेला असलेल्या अपूऱ्या सोयीसुविधा आणि संसाधने मिळवून देण्यासाठी पदाधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी यांनी विशेष लक्ष पुरविण्याची मागणी तालुक्यातून पुढे आली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन या क्षेत्राचे आमदार सहसराम कोरोटे, पंचायत समितीच्या सभापती अंबिका बंजार, उपसभापती अनिल बिसेन, गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे, शाळेचे मुख्याध्यापक मंगलमूर्ती सोयाम आणि सहकारी शिक्षक यांनी केले असून शाळेचे मुख्याध्यापक सोयाम आणि इतर शिक्षक, पालक आणि शाळा व्यवस्थापनाचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

# जानकीदेवी चौरागडे हायस्कूलचा शंभर टक्के निकाल



**गोंदिया** :- कुडवा येथील जानकीदेवी चौरागडे हायस्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. प्रतिक ढेकवार याने ९२.६० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. राजीव राकेश वारजुरकर याने ९१.६० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक, तर आर्यन हरिश शहारे, अमिषा झनकलाल ठाकरे, तृप्ती मुलचंद न्यायकरे यांनी संयुक्तपणे ८९.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

एकूण ४१ विद्यार्थी परिक्षेत प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २२ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले, तर १८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव सुरेश चौरागडे व संचालिका रेखादेवी चौरागडे, मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी त्यांचे अभिनंदन केले.

# जी.एम.बी. इंग्लिश मिडीयम हायस्कूल ने राखली गुणवत्तापूर्ण १०० टक्के निकालाची परंपरा



**अर्जुनी मोरगाव:-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यात अर्जुनी मोरगाव येथील श्रीमती केशरबाई शिक्षण संस्थाद्वारा संचालित जी.एम.बी इंग्लिश मीडियम हायस्कूल विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून कु. आचल विनायक पुस्तोडे ९८.४० टक्के गुण घेऊन जिल्ह्यातून प्रथम तर साहीली कृष्णा बनपुरकर ९५.४० टक्के गुण घेऊन शाळेतून द्वितीय, शौर्या ओमप्रकाशसिंह पवार ९४.२० टक्के गुण घेऊन शाळेतून तृतीय आली.

जी. एम.बी. हायस्कूल मधून एकूण ९३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी गुणवत्ता प्राप्त १७ विद्यार्थी प्रयांक रवींद्र मेश्राम ९४.००%, वंशिका सुधीरकुमार राऊत ९३.८०%, सुशांत परमानंद मेश्राम ९३.२०%, आर्यन प्रमोद कोरे ९३.००% भाग्यश्री खुशाल नाकाडे ९२.६०%, कृतिका कुंडलिक लोथे ९२.६०%, हिमांशी आशिष जेठवा ९१.६०%, धवल कांतिकुमार बोरकर ९१.४०%, शर्वरी सनतकुमार वाढई ९१.२०%, प्रज्ञा सुरेंद्र खोबरागड़े ९१.००%, उन्नति सुनील गोलदार ९१.००%, तोषित लीलाधर भूते ९०.८०%, युक्ता ईश्वरचंद पालीवाल ९०.८०%, काव्य रोशन गोंडाने ९०.२०%.प्रविण्याप्राप्त ५९ प्रथमश्रेणी विद्यार्थी १४, द्वितीयश्रेणी ०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेतील सर्व गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष बल्लभदास भुतडा, संस्थाध्यक्ष जयप्रकाश भैय्या,संस्था सचिव सर्वेश भुतडा, समन्वयक भगीरथ गांधी, प्राचार्या शैव्या जैन, प्राचार्य जे .डी.पठाण, उप प्राचार्या छाया घाटे, पर्यवेक्षक महेश पालीवाल, प्रा. टोपेशकुमार बिसेन, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले.

# लाचखोर सपोउपनि एसीबीच्या जाळ्यात

**गोंदिया** :- तक्रारकर्त्यांशी गैरअर्जदारासोबत झालेले भांडण व पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचलेले प्रकरणात मध्यस्थी करून दोघांची समजुत घालून वाद समेट करून दिला. या मोबदल्यात १० हजार रूपयाची लाच मागणाऱ्या गोंदिया शहर पोलिस ठाण्यातील सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकाला (ता.२६) लाचलुच-पत विभागाने सापळा रचून जाळ्यात अडकविले. लाचखोर सपोउपनि याने तक्रारकर्त्याकडून ८ हजार रूपयाची लाच स्विकारली. अनिल फागुजी पारधी ( पद-सपोउपनि) रा.श्रीनगर गोंदिया असे आरोपीचे नाव आहे.

सविस्तर असे की, तक्रारकर्ता ट्रॅक्टर चालक असून त्याच्याविरूध्द २४ मे रोजी गैरअर्जदाराने गोंदिया शहर पोलिस ठाण्यात तोंडी तक्रार केली. तक्रारीनंतर सपोउपनि अनिल पारधी याने तक्रारकर्त्याशी संपर्क केले. दरम्यान दोघांचे भांडण आपसात समजुत घडविण्यासाठी आपण प्रयत्न केले. त्यामुळे गुन्हा दाखल होणार नाही, या मोबदल्यात १० हजार रूपये लाचेची मागणी केली. दरम्यान तक्रारकर्त्याला लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली. यानुरूप सहनिशा केली असता सपोउपनि पारधी १० हजार रूपये लाच मागत असल्याचे समोर आले. त्यानुरूप (ता.२६) सापळा रचण्यात आला.

# स्व.ब्रीजलालजी कटरे हायस्कूल शहारवानीचे सुयश



**गोरेगाव:** विकास शिक्षण संस्था गोरेगाव द्वारा संचालित स्व.ब्रीजलालजी कटरे हायस्कूल शहारवाणी विद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेत सहभागी झाले व उत्तीर्ण झाले. विद्यालयातून १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. विद्यालयातून प्रथम क्रमांक

कु. रत्ना अशोक हटिले व कु.अमिषा मोहनलाल कटरे हिने संयुक्तरित्या ९२ टक्के गुण मिळवून पटकावला. तर द्वितीय क्रमांक कु. विजया किशोर पारधी हिने ८९ टक्के गुण मिळवून व तृतीय क्रमांक कु. निशा नेतराम नाईक हिने ८८.६० टक्के गुण मिळवित पटकावला आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष एड. टी.बी.कटरे, संस्था उपाध्यक्ष डॉ टी.पी. येडे, संस्था सचिव यू.टी.बीसेन, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, शालेय समिती चे सर्व पदाधिकारी, म ुख्याध्यापक आर.वाय.कटरे. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# पांढरीत सौर उर्जा योजनेची पाण्याची टाकी कोसळून फुटली



**गोंदिया:-** सडक अर्जुनी तालुक्यातील पांढरी येथे काही दिवसा पूर्वी जल जीवन मिशन अंतर्गत सोलर पाणी पुरवठा योजना गावात तयार करण्यात आली.त्या योजनेंतर्गत दोन वेगवेगळ्या ठिकाणी सोलर पंप बसवून पाण्याकरीता प्लास्टिकची टाकी लावण्यात आली.मात्र योजनेच्या कामात गुणवत्ता नसल्याने या नित्कृष्ठ कामाची पोलखोल लावण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीने केली आहे.

योजनेचे काम होऊन काही दिवस लोटत नाही तोच ९-१० लाख रुपये खर्च झालेल्या निधीतील पाणी भरलेली टाकी खाली कोसळून फ़ुटल्याने कंत्राटदाराने नित्कृष्ठ साहित्याचा वापर सौरउर्जेवरील पाणी योजनेत केल्याचा आरोप गावातील नागरिकांनी केला आहे.योजनेच्या ठिकाणी दिनांक २३/०५/२०२४ ला सायंकाळी ८-९ वाजेच्यां सुमारास पाण्याने भरलेली टाकी आपोआप फुटून खाली कोसळली. यापूर्वी सुध्दा अशीच घटना घडली होती,तरीही प्रशासन याकडे लक्ष द्यायला तयार नसल्याचे नागरिकांचे म्हणने आहे.

# बुध्दीस्ट सोसायटी संस्थेच्या राष्ट्रीय सल्लागार समीती सदस्य पदी राजकुमार बडोले यांची नियुक्ती



**अर्जुनी मोरगाव:** महामानव परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या "द बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया" संस्थेच्या राष्ट्रीय सल्लागार समीती चे सदस्य म्हणून राज्याचे माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ईजी राजकुमार बडोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही निवडणुक द बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे राष्ट्रीय अध्यक्ष आयु.चंद्रबोधी पाटील तसेच संस्थेच्या सर्व केंद्रिय कार्यकारीणी ने केली आहे.

बौध्द धम्माचे तत्व-ज्ञान व विचारधारा संपुर्ण भारत वर्षात पसरविण्याचे एक महान कार्य सदर सोसायटीच्या मार्फत करण्यात येते. बुध्दाच्या प्रेम, दया, अहिंसा, स्वातंत्र व समता या विचारधारेचे तत्वज्ञान मानव कल्याणासाठी उपयुक्त असुन सदर संस्थेच्या माध्यमातून मानव समाजामधे एकता एकात्मता व बंधुभावाची भावना ज़ोपासण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जाते.माजी मंत्री राजकुमार बडोले यांच्या निवडीमुळे सदर राष्ट्रीय सल्लागार सम ितीवर एक सल्लागार म्हणून अमुल्य वेळ व प्रतिभेचा निश्चितच उपयोग होईल.

माजी मंत्री राजकुमार बडोले यांची द बुध्दीस्ट सोसायटी ऑफ़ इंडिया संस्थेच्या राष्ट्रीय सल्लागार समीती वर सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल भंडारा-गोंदिया जिल्ह्यातील बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया चे जिल्हा कार्यकारीणी तथा दोन्ही जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरीय पदाधिकारी आदिंनी माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे अभिनंदन केले आहे.

# परशुराम विद्यालय मोहगाव(बु.)चा ९८.६०टक्के निकाल,शास्वती पटले विद्यालयातून प्रथम



**गोरेगाव:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. यामध्ये तालुक्यातील परशुराम विद्यालय मोहगाव(बु) शाळेचा निकाल ९८.६० टक्के ला-गला असून विद्यालयातून ७४ विद्यार्थी परिक्षेला बसले होते.त्यापैकी ७३ उत्तीर्ण झाले असून २८ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीत आले.प्रथम श्रेणीत २२ व व्दितीय श्रेणीत १७ विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे.विद्यालयातून तसेच परीक्षा केंद्रातून कु. शाश्वती पटले हिने ९०.८० टक्के गुण प्राप्त करीत प्रथम क्रमांक पटकावला.तर व्दितीय क्रमांक कु.सिमरन गजभिये हिने ९०.४० टक्के गुण घेत पटकावला.तृतीय क्रमांक कु. मिनल गौतम व कु. आचल शहारे या दोघींनी ८५.८० टक्के गुण मिळवित संयुक्त पटकावला आहे.चतुर्थ क्रमांक कु.हर्षा चन्ने हिने ८५.४० टक्के गुण मिळवित पटकावला.त्यासोबतच कु.जानवी चौहान ८४.६०%,कु.भारती कटरे ८३.२०%,कु.शुभांगी रहांगडाले ८२.००%,कु. विशाखा अंबुले ८१.००%, आदित्य हरिनखेडे ८१.००%, युग पटले ८०.००%, कु.रूचि कटरे ८०.००%, कु.काजल दिवटे ८०.००%,कु.खुशबू पटले ८०.००%, कु.तेजश्विनी चंडेमेश्राम ८०.००%, कु.तनुश्री गोंडाने ७९.८०%, कु.साक्षी कुसराम ७९.८०%, कु.प्रणाली राणे ७९.२०%, कु.प्रीती रहांगडश्रले ७९.२०%, कु.अश्विनी पटले ७८.४०%,धीरज चौधरी ७८.४०%, कु.आँचल मरकम ७८.२०%, कु.सुहानी बागड़े ७७.२०%,कु प्राची शाहारे ७५,८०%,कु.शीतल पटले ७५,८०%, कु.कावेरी महंतो ७५,४०% व आकाश चंडेमेश्राम ७५,००% या विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी प्राप्त केली आहे.विद्यालयातील उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रविकांत बोपचे,संस्थेचे सचिव डॉ.खुशालचंद्र बोपचे,प्रभारी मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# ८७ गावांना बॅक वॉटर चा धोका

**गोंदिया:** जिल्ह्याला तब्बल लहान व मोठ्या अशा सहा नद्या लाभल्या. या नद्या जीवनदायिनी म्हणून ओळखल्या जातात. तितकाच रोद्ररुप त्या पावसाळ्यात धारण करतात. या नदीकाठावरील तब्बल ८७ गावांतील नागरिकांना पावसाळ्यात हातात जीव घेऊन जीवनयापन करावे लागते. दरवर्षी यापैकी निम्म्या गावांत पुराचे पाणी शिरते.

सध्या मान्सून सक्रिय झाला आहे. जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून पावसाचे पुनरागमन झाले. नद्या कोरड्या असल्या, तरी नाले मात्र भरुन वाहत आहेत. लहानमोठ्या नाल्यांचे पाणी वैनगंगा, गाढवी, वाघ, चुलबंद, बहेला, पांगोली नद्यांना जाऊन मिळते. गोंदिया जिल्ह्यातील सर्वात मोठी नदी वैनगंगा आहे. या नदीचे पात्र खोल असल्यामुळे या नदीतील



पाणी सहसा गावांमध्ये शिरत नाही. मात्र याशिवाय इतर नद्या मात्र जिल्ह्यातील नागरिकांसाठी पावसाळ्यात पूर आल्यास काळ बनून येतात.

सालेकसा, आमगाव आणि गोंदिया तालुक्यातील अनेक गावे वाघ आणि पांगोली या दोन नद्यांपासून येणाऱ्या पुराच्या पाण्यापासून बाधित होतात. तर गाढवी, चुलबंद, बहेला या नद्यांचे पाणी सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगव या तालुक्यांतील गावांमध्ये शिरते. मुख्यत्वे वाघ, पांगोली, चुलबंद, बहेला, गाढवी या नद्यांचे पाणी वैनगंगा नदीला मिळते.

वैनगंगा नदी मध्य प्रदेशातून वाहत येते. या नदीवर मध्यप्रदेशात असलेल्या संजय सरोवरातील पाण्याचा साठा वाढल्यास सुरक्षेच्यादृष्टीने प्रशासन सरोवरातील पाणी नदीत सोडते. परिणामी बॉक वॉटरमुळे गोंदिया जिल्ह्यातील नद्यांतील पाणीपातळी अचानक वाढून पाणी गावात शिरते. पुराच्या पाण्यापासून बाधित होणारी जिल्ह्यात ८७ गावे आहेत.

या गावांतील नागरिकांना पुराच्या पाण्यापासून आणि जिवितहानी टाळता यावी, यासाठी जिल्हा प्रशासन जिलह्यात प्रशिक्षण, जनजागृती कार्यशाळा राबवितो. पारंपरिक साधन व घरात उपलब्ध असलेल्या वस्तूंचा प्रयोग करुन आपत्तीला तोंड देण्यास मदत मिळते. यावर जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते.

### आपत्ती निवारण पथक सज्ज

**जिल्हास्तरीय आपत्ती निवारण विभागाने गत काही वर्षांपासून कात टाकली. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी घडणाऱ्या घटनेपासून जीव आणि मालमत्तेची हानी रोखण्यासंदर्भात वारंवार प्रशिक्षण देण्यात येत आहे. बचाव आणि मदतीचे अत्याधुनिक साहित्य पथकाला उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यामुळे आपत्तीकाळात मदतीसाठी विभाग २४ तास सज्ज आहे.**

### बचावाच्या साधनांपासून वंचित

**पुरपरिस्थितीपासून बचाव करण्यासाठी साधने, अवजारे, स्वयंचलित डोंगे, कटर, सक्यरुलर सॉ, चैन सॉ, बोल्ट कटर आदी साहित्यांचा वापर होतो. जिल्हा प्रशासन पावसाचे आणि पुराच्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी नदीकाठच्या नागरिकांना दरवर्षी प्रशिक्षण देते. मात्र, प्रशिक्षणानंतर स्थानिक नागरिकांना कसल्याही प्रकारचे बचावाच्या कामी येणारे साधन, साहित्य वितरित करण्यात येत नाही. त्यामुळे त्या नागरिकांनी पुरपस्थितीत स्वत:चा व कुटूंबाचा बचार करावा तरी कसा? असा सवाल उपस्थित होत आहे.**

# नागरिकांची हत्या; छत्तीसगड चकमकीनंतर नक्षल्यांचा पत्रकातून आरोप

**गडचिरोली :** मे महिन्यात छत्तीसगडच्या अबुझमाड परिसरात झालेल्या चकमकीत पोलिसांनी नक्षलवाद्यांच्या नावावर काही सामान्य नागरिकांना ठार मारले, असा गंभीर आरोप नक्षलवादी संघटनेचा पश्चिम सब झोनल ब्युरो श्रीनिवास याने पात्रकातून केला आहे. छत्तीसगडसह महाराष्ट्रातील नक्षलवादी कारवायांचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अबुझमाडच्या विस्तीर्ण जंगलात पाच महिन्यांत १०७ नक्षलवाद्यांचा छत्तीसगड पोलिसांनी खात्मा केला. अबुझमाड हा नक्षलवाद्यांचा गड आहे.

गडचिरोली पोलिसांची नक्षलविरोधी मोहीम, कम्युनिटी पोलिसींग यामुळे नक्षल चळवळीला हादरे बसले. अनेक नक्षलवादी नेते चकमकीत ठार झाल्याने जिल्ह्यात ही हिंसक चळवळ काहीशी कमकुवत झाली आहे. मात्र, छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या कुरापती सुरूच असतात. तेथे नक्षलवाद्यांची संख्याही अधिक आहे. त्यामुळे तेथील पोलिसांनीही नक्षलविरोधी अभियान गतिमान केले आहे.

या पार्श्वभूमीवर नक्षलवादी संघटनेचा पश्चिम सब झोनल ब्युरो श्रीनिवास याने एक पत्रक जारी करून छत्तीसगड पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. वन्यप्राण्यांच्या दहशतीत आदिवासी वर्षानुवर्षे जंगलात राहतात. मात्र, नक्षलवादी ठरवून निरपराध लोकांचा बळी घेतला जात आहे, असा आरोप त्याने केला आहे. याविरुद्ध जनआंदोलनाचीही हाक त्याने दिली आहे. या पत्रकात गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील कतरंगट्टा येथे १३ मे रोजी झालेल्या चकमकीत ठार झालेल्या नक्षलवाद्यांचाही उल्लेख आहे.

छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्याच्या काकूर–टेकामेट्टा जंगलात पारंपरिक पूजापाठ करण्यासाठी काही महिला गेल्या होत्या. गावकऱ्यांसमोर या जंलगात चार युवकांना पोलिसांनी गोळ्या झाडून संपविले. याच परिसरात त्याच दिवशी सहा जणांना ठार केले. १० मे रोजी बिजापूरच्या जंगलात तेंदूपाने तोडण्यासाठी गेलेल्या गावातील १२ जणांना घेरले व गोळ्या झाडून संपविले, असे गंभीर आरोप या पत्रकात करण्यात आले आहेत.




**या पत्रकाबद्दल माहिती नाही. ते पत्रक पाहण्यात आले नाही. मी सध्या सुटीवर आहे, त्यामुळे याबद्दल मला अधिक सांगता येणार नाही.**
**- सुंदरराज पत्तीलिंगम,**
**विशेष पोलीस महानिरीक्षक, बस्तर, छत्तीसगड.**

# मृद, जलसंधारण विभागाचे कामकाज चालते वाऱ्यावर

## अभियंत्यांची सर्व पदे रिक्त; रिक्त पदांमुळे अनेक कामांवर परिणाम

**सालेकसा:** येथे मृद व जलसंधारण विभागाचे कार्यालय असून हे कार्यालय केवळ नावालाच विभागीय कार्यालय ठरत आहे. या कार्यालयात अभियंत्यांची एकूण सहा पदे मंजूर असून सर्व पदे रिक्त आहेत. परिणामी या कार्यालयात होणारी जलसंधारणाची कामे थंडबस्त्यात आहेत. या विभागांतर्गत सर्व प्रकल्प अपूर्ण आहेत. तर काही सुरुच झाली नाही. कार्यालयात एका सेवानिवृत्त अभियंत्याला बसवून ठेवले जात असून या कार्यालयाचे कामकाज वाऱ्यावर सुरु असल्याचे चित्र आहे.

सालेकसा तालुका स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षापर्यंत विकासापासून वंचित आहे. मुबलक प्रमाणात जल, जंगल, जमीन असून सुद्धा लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष, शासनाच्या उदासिनतेमुळे तालुकास्तरावरील कार्यालयात सातत्याने रिक्त पदे आहेत. सालेकसा तालुक्यातील मृद व जलसंधारण कार्यालय उपविभागीय कार्यालय आहे. या कार्यालयातून तीन तालुक्यांचे काम चालते. आता या कार्यालयातून आमगाव व सालेकसा तालुक्याचे काम पाहिले जाते.




दोन तालुक्यांमध्ये जलसंधारण संबंधित अनेक प्रकल्पांची दखल घेण्यापासून ते आमगाव व सालेकसा तालुक्यात जलसंधारणाची अनेक नवीन प्रकल्प उभारणीची कामे केली जात आहेत. दोन्ही तालुक्याची पाणी पातळी वाढविणे अणि सिंचन क्षेत्र वाढविणे यासाठी दोन्ही तालुक्यात नवीन जलसंधारण प्रकल्प मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. ही सर्व तांत्रिक कामे करण्यासाठी सहा अभियंत्यांची पदे मंजूर आहेत. परंतु कार्यालयात एकच मुख्य अभियंता आहे. त्यांनाच कार्यालयाचे काम पाहावे लागते. विविध प्रकारच्या बैठकांना उपस्थित राहावे लागते.

### मुख्य कार्यालयाची धुरा एक अभियंत्यावर

**हे मुख्य कार्यालय आहे. येथे एका सेवानिवृत्त अभियंत्याला कंत्राटी तत्वावर ठेवण्यात आले आहे. परंतु त्यांना आठवड्यातून तीन ते चार दिवस विविध कामांसाठी मुख्य कार्यालय गोंदिया येथे जावे लागते. एका अभियंत्यावर एकीकडे काम सुरु असतानाच दुसरीकडे आमगावसह सालेकसा तालुक्यातील अनेक प्रकल्पांच्या तयारी आणि मंजुरीच्या कामावर परिणाम होत आहे. अभियंत्यांची पदे रिक्त असल्याने कामावर परिणाम होत आहे. तर जलसंधारण बाबत अनेक प्रकल्पांना मंजुरी देण्याची तयारी शासनाकडून सुरु आहे. परंतु मनुष्यबळ नसल्याने सर्व प्रकल्प थंडबसत्यात आहेत. नवीन प्रकल्प आणि अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याच्या कामावरही परिणाम होत आहे.**

# २० कोटींच्या निधीतून आमगाव रेल्वेस्थानकाचा कायापालट

## अमृत भारत योजनेत समावेश: काम संथगतीने, प्रवाशांमध्ये नाराजी

**आमगाव:** रेल्वे मंत्रालयाने अमृत भारत योजनेअंतर्गत देशातील ४०० रेल्वेस्थानकांचा कायापालट करण्याची घोषणा केली. या योजनेत आमगाव रेल्वेस्थानकाचा समावेश आहे. या रेल्वेस्थानकावर विविध विकासकामे करण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या अंतर्गत कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, काम फारच संथगतीने सुरु असल्याने ते वेळेत पूर्ण होणार का, याबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

हावडा–मुंबई मार्गावरील आमगाव हे एक महत्वपूर्ण स्थानक आहे. या रेल्वेस्थानकावर मोजक्याच गाड्यांना थांबा असला तरी महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील प्रवाशांसाठी हे रेल्वेस्थानक महहत्वपूर्ण आहे. रेल्वे मंत्रालयाने सहा महिन्यांपुर्वी अमृत भारत योजनेअंतर्गत रेल्वेस्थानकावर प्रवाशांसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला. विमानतळाच्या धर्तीवर रेल्वेस्थानकाला लूक देण्याचा प्रयत्न केला जात आहे. यात योजनेत आमगाव रेल्वेस्थानकाचा समावेश असून, या रेल्वेस्थानकासाठी २० कोटी रुपयांचा निधू मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून पहिल्या टप्प्यात येथे रेल्वेस्थानकार आकर्षक प्रवेशद्वार तयार करण्यात येणार आहे. तसेच रेल्वेस्थानकावर प्रवाशांच्या सुविधेसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

२४ फेब्रुवारीपासून या रेल्वेस्थानकावर प्रवेशद्वारासह विविध कामांना सुरुवात करण्यात आली आहे. पण कामाची गती फारच संथ असल्याने गेल्या चार महिन्यांत मोजकेच काम झाले आहे. त्यामुळे नियोजित वेळेत रेल्वेस्थानकावरील विविध विकासकामे पूर्ण होणार का, असा सवाल प्रवाशांकडून केला जात आहे.



**अमृत भारत योजनेअंतर्गत आमगाव रेल्वेस्थानकात विविध कामे रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार व निविदेनुसार सुरु आहेत. या रेल्वेस्थानकात उजव्या बाजूला दिव्यांगासाठी पादचारी पुल असून डाव्या बाजूला एका नवीन पुलाची मागणी करण्यात आली आहे.**
**राजेश भीमकर, स्टेशन व्यवस्थापक, आमगाव रेल्वेस्थानक.**

### कोणत्या सुविधा उपलब्ध होणार

**अमृत भारत योजनेअंतर्गत रेल्वेस्थानकावर कचरा व्यवस्थापन, बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, हायमास्ट लाइट लावले जाणार आहेत. येथील रेल्वेस्थनकात लिफ्टदेखील बसवली जाणार आहे. रेल्वेच्या वेळा दर्शविण्यासाठी आधुनिक डिजिटल बोर्ड तसेच तिकीटघराचा विकास करण्यात येईल. दिव्यांग प्रवाशांची गैससोय होणार नाही याचीसुद्धा काळजी घेतली जात आहे.**

### सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढविणार

**या रेल्वेस्थानकात प्रवेश व निर्गमन द्वार, एसीपी, पोर्च, पार्किंग टू–व्हीलर, थ्री व्हीलर, फोर–व्हीलर, बी.बी.एस.मॉडेल प्रसाधनगृह, अतिरिक्त सीओपी, सीसीटीव्ही कॅमेरे, लिफ्ट दोन, कोच व ट्रेन इंडिकेशन बोर्ड,सिलींग वॉल पॅनेलिंग, प्रथम व दुसरा दर्जा प्रतीक्षालय आदी कामांचा समावेश आहे.**

### एक्सप्रेस गाड्यांचा थांबा वाढवा

**आमगाव रेल्वेस्थानक हे एक महत्वपूर्ण रेल्वेस्थानक असून या रेल्वेस्थाकावर अजूनही बऱ्याच एक्सप्रेस आणि सुपरफास्ट गाड्यांना थांबा नाही. त्यामुळे प्रवाशांना ३० किमी अंतरावरील गोंदिया रेल्वेस्थाकावरुन प्रवास करावा लागतो. प्रवाशांची अडचण लक्षात घेता एक्सप्रेस आणि सुपरफास्ट गाड्यांचा थांबा या रेल्वेस्थानकावर वाढविण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.**

# मागवला मोबाईल, निघाला बेल्ट

**गोंदिया :** सद्य:स्थितीत ऑनलाइन व्यवहार करण्याचे प्रमाण वाढले असून, बहुतांश ठिकाणी फसवणूक झाल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ऑनलाइन व्यवहार करताना काळजी घेऊनच व्यवहार करावा, अन्यथा मोठी आर्थिक फसवणूक होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. असाच काहीसा प्रकार तालुक्यातील धापेवाडा येथे उघडकीस आला. एका युवकाने मोबाईल मागविला असता, त्याच्या हातात पोस्टातील पार्सलमधून चक्क बेल्ट पडला. तथापि, फफसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्याने दवनीवाडा पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.याबाबत सविस्तर असे की, धापेवाडा येथील शिवानंद भोजराज भेलावे (वय ३०) याला एका मोबाईल क्रमांकावरून फोन आला. चार हजार ६०० रुपयांना मोबाईल फफोन मिळेल, असे त्यावरून सांगण्यात आले. दरम्यान, २१ मे रोजी पोस्ट ऑफीसमार्फत शिवानंद भेलावे याच्या नावाने एक पार्सल आले. सांगितल्यानुसार, चार हजार ६०० रुपये भेलावे याने पोस्ट ऑफीसमध्ये भरले व पार्सल घेतले. नंतर काही क्षणातच पोस्ट ऑफीसमध्येच हे पार्सल उघडून पाहिले असता, सदर पार्सलमध्ये मोबाईल फोन नाही, तर एक बेल्ट (कमरपट्टा) निघाला.

यात ऑनलाइन फोनवरून फसवणूक झाल्याची तक्रार भेलावे याने दवनीवाडा पोलिसांत केली आहे. दरम्यान, ठाणेदार सतीश जाधव यांनी शाखा डाकपालास पत्र पाठवून सदर पार्सल आपल्या कोणत्या कार्यालयात, कोणत्या व्यक्तीकडून किंवा कंपनीकडून पाठविण्यात आले, त्यांच्याशी संपर्क करावा, भरणा केलेली रक्कम पुढे पाठवू नये, असे सांगितले आहे.

# सोनेचांदीचे दागीणे लंपास करणारी टोळीला जेरबंद



**गोंदिया:–** शहरातील मुख्य बसस्थानक व इतर ठिकाणाहून सोनेचांदीचे दागीणे लंपास करणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात रामनगर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. संशयित महिला सिमरण आशिष बिसेन (२४), विधीसंघर्ष बालिका (१५), सुरज पप्पु बिसेन (२०), आशिष पप्पु बिसेन (२८) सर्व रा. कुडवा/गोंदिया अशी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींच्या ताब्यातून २० लाख ९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्याच्या कलपाथरी येथील अरुणा गौरव येडे या १८ मे रोजी संध्याकाळी साडेचार वाजताच्या सुमारास मुख्य बस स्थानकावर मुलासह गोंदिया–भंडारा बसमध्ये चढत असताना त्यांच्या पर्समधील सोनेचांदीचे दागीणे व रोख २५,००० असा २ लाख ४३ हजारचा मुद्देमाल चोरी झाल्याची तक्रार पोलिसात दिली. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ घटनास्थळ गाठून परीसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. यात दोन संशयास्पद महिला अरुणा यांच्या मागावर असल्याचे दिसले. अरुणा ज्या बसमध्ये चढत होत्या तेथील गर्दीचा फायदा घेत त्यांच्या पर्शमशील सामान चोरी करून पळून जातांना दिसून आल्या. गोपनीय बातमीदाराद्वारे संशयीत महिलांची माहिती करून २१ मे रोजी सिमरण व विधीसंघर्ष बालिकेला ताब्यात घेतले. दोघींचीही चौकशी केली असता बसस्थानक व इतरही ठिकाणी चोरी केल्याची कबूली त्यांनी दिली.

घरझडतीमध्ये अरुणा यांचा २ लाख २८ हजार रुपयांचा व इतर ठिकाणहून चोरी केलेला १७ लाख ८१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. महिन्याभरापूर्वी सालेकसा बसस्थानकातून एका महिलेच्या पर्समधून चोरल्याचे तसेच उर्वरीत मुद्देमाल आरोपी सुरज व आशिष यांनी गोंदिया शहर व परीसरातून चोरी केल्याचे सांगितले. असा २० लाख ९ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल पोलिसानी हस्तगत केला आहे. चौघांनाही रामनगर पोलीसांचे स्वाधीन करण्यात आले.

# आपत्ती निवारणासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे-जिल्हाधिकारी प्रजित नायर

## मान्सून पुर्वतयारी आढावा बैठक



**गोंदिया :** पावसाळा सुरु होण्यास खूप कमी कालावधी बाकी असून अशा परिस्थितीत प्रत्येक विभागाने दक्ष राहणे आवश्यक आहे. आपत्ती ही कधीही सांगून येत नाही. पावसाळ्याच्या दिवसात अचानक पूर येणे, धरण फुटणे, रस्ता वाहून जाणे, गाव पाण्याखाली येणे अशा आपत्ती ओढवतात. त्यामुळे आपत्ती निवारणासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज मान्सून पुर्वतयारी आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील जुने रस्ते, इमारत, पूल, शासकीय इमारत, शाळा व महाविद्यालय इत्यादींचे संबंधित यंत्रणेने संरचना तपासणी (स्ट्रक्चरल ऑडीट) करुन वापरण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्र देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. मान्सून कालावधीत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करुन तो चोवीस तास कार्यरत राहील याची खात्री करावी असे ते म्हणाले.

गोंदिया जिल्ह्यात ९६ गावे पूरप्रवण असून या गावात विशेष उपाययोजना असलेला सुक्ष्म आराखडा तयार करावा. या गावांसाठी पर्यायी मार्गांची यादी तयार करावी. त्याचप्रमाणे पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी तात्काळ सादर करावी. मान्सून तसेच आपत्तीच्या वेळेस कार्य प्रणालीची कार्यपध्दती अद्ययावत करावी असे त्यांनी सांगितले.

१ जून पासून तालुका निहाय नियंत्रण कक्ष स्थापन करुन नियंत्रण कक्षात पूर्ण कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. त्याचप्रमाणे नगरपालिका, नगरपंचायत व ग्रामपंचायत स्तरावर आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी. अनुभवी पोहणा?या व्यक्तींची यादी अद्ययावत करण्यात यावी. या यादीत महसूल व पोलीस विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात यावा. कार्यप्रणालीची प्रमाणित कार्यपध्दती (एसओपी) अद्ययावत करुन आपत्ती व्यवस्थापन कक्षाला पाठविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

धरणाचे पाणी सोडतांना गावकऱ्यांना पूर्व सूचना देण्यात यावी. त्यासाठी दवंडी, सोशल मिडिया आदीचा वापर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले. आपल्या कार्यक्षेत्रात सुरक्षीत निवारा, समाज भवन, शाळा, मंगल कार्यालय, लॉन, मोठ्या इमारती इत्यादींची ओळख करुन त्या आरक्षीत करण्याबाबत त्वरित कार्यवाही करावी. मान्सून कालावधीत विविध जलाशय, धरण या ठिकाणी नागरिकांनी जाऊ नये असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

नाल्यामधील गाळ काढणे, सफाई व स्च्छता तातडीने करुन घ्यावी. नदी, नाल्याच्या काठावर अतिक्रमण करणा?यांना नोटीस देण्यात यावी. जिल्ह्यात वैनगंगा व बाघ या महत्वाच्या नद्या असून या ठिकाणी संदेशवहन यंत्रणा अद्ययावत ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नेमून दिलेली जबाबदारी प्रत्येक विभागाने पार पाडून मान्सून काळात आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी नियमीत संपर्क ठेवावा असे त्यांनी सांगितले. प्रत्येक तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक घ्यावी. सर्व यंत्रणांनी पूरपरिस्थिती व आपत्तीच्या काळात समन्वय ठेवून काम करावे, तसेच दिलेल्या जबाबदारीचे गांभीर्याने पालन करावे असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे व पुरामुळे काही गावांचा संपर्क तुटतो. त्यादृष्टीने बाधितांसाठी निवारा, भोजन व्यवस्था तसेच धान्य व औषधसाठा आदी सामुग्रीची व्यवस्था आधीच करुन ठेवावी. पूर परिस्थितीत वीज पुरवठा खंडीत होतो, अशावेळी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणने प्रभावी नियोजन करावे असे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील संभाव्य पूरबाधित गावे तसेच बचाव पथकांसाठी रबर बोट, फायबर बोट, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, रोप बंडल, सर्च लाईट, मेगा फोन, ग्लोव्हज, जइच मशिन, सॅटेलाईट फोन, टॉर्च, अस्का लाईट, हेल्मेट आदी विविध साधने संदर्भात पुर्वतयारी आताच करुन ठेवावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे यांनी नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले.

# शिक्षण विभागात तब्बल २० पदे रिक्त

## संपूर्ण कारभार चालतो उधारीवर, रिक्त पदांमुळे शिक्षण विभाग अजारी

**गोंदिया:** माध्यमिक शिक्षण विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे या कार्यालयावर अवलंबून असणाऱ्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांची कामे प्रभावित झाली आहेत. माध्यमिक शिक्षण विभागाचा गाडा ओढण्यासाठी कार्यकत एक अधीक्षक आणि एक चपराशी या दोन कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. २२ मंजूर पदापैकी केवळ दोनच कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात आली असून इतर पदे मात्र उधारीवर आहे.



जिल्ह्यात सुरु असलेल्या अनुदानित आणि विनाअनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या जवळपास सातशेवर आहे. या शाळांची शैक्षणिक गुणवत्ता आणि भौतिक सुविधा तपासून नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा ठिकाणी माध्यमिक शिक्षण विभाग या कार्यालयाची निर्मिती करण्यात आली आहे. परंतु या कार्यालयात अनेक वर्षांपासून शासनाच्या दुर्लक्षामुळे मंजूर असलेली पदे रिक्त आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने २ उपशिक्षणाधिकारी, ३ शिक्षण विस्तार अधिकारी, २ अधीक्षक, ३ वरिष्ठ सहाय्यक, ७ कनिष्ठ सहाय्यक आणि ४ चमराशी अशी एकूण मंजूर २२ पदे असताना प्रत्यक्षात आणि १ चपराशी कार्यरत आहेत. कार्यालयीन कामासाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून या कार्यालयात दररोज हजारो लोक येत असतात, परंतु येथील रिक्त पदांमुळे कामे न आटोपताच, त्यांना आल्यापावली परत जावे लागत असल्यामुळे आर्थिक खर्चाला सामोरे जावे लागते.

ही कामे झाली प्रभावित

सेवानिवृत्ती प्रकरणे, विद्यार्थी शिष्यवृत्ती, इबीसी सवलतीची कामे, शालेय पोषण आहार, मानव विकास, शाळांचे ऑडिट करणे, कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता देणे, तुकड्या मान्यता, संच मान्यता, उच्च माध्यमिक शाळांचा स्वतंत्र टेबल सांभाळणे, शिबिरे आयोजित करणे, शाळांना भेटी देऊन गुणवत्ता तपासणे, जिल्ह्यात सुरु असणाऱ्या शाळांच्या उद्भवणाऱ्या अडीअडचणींचे निराकरण करणे आदि विविध स्वरुपातील कामे आटोपण्यासाठी कायमस्वरुपी कर्मचारी नियुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे.

**प्राथमिकमध्येही बोंब**

जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग महत्वाचा आहे. मात्र या विभागाला शिक्षणाधिकारी ते शिक्षकांपर्यंत रिक्त पदांचा शाप लागला आहे. माध्यमिक शिक्षण विभागाप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभागातील पदेदेखील रिक्त आहेत. शिक्षणाधिकारी पदही प्रभारी अधिकाऱ्यांनाच देण्यात आले. त्यामुळे अधिकाऱ्यांना काम करताना मोठी अडचण होत आहे.